महाराष्ट्र शासनाचा २००८-२००९ या वर्षाचा
अर्थसंकल्प विधानसभेला सादर करताना

# वित्त मंत्री श्री. जयंत पाटील

यांनी बुधवार, दिनांक १९ मार्च २००८ रोजी
केलेले भाषण

## भाग पहिला

महोदय,

मी आपल्या अनुमतीने सन २००८-०९ या वर्षाचा राज्याचा अर्थसंकल्प सभागृहाला सादर करीत आहे.

**स्थूल आर्थिक आढावा.** २. १९९९-२००० च्या स्थिर किंमतीनुसार राष्ट्रीय पातळीवर देशांतर्गत स्थूल उत्पन्न आधीच्या वर्षी ९.६ टक्के दराने वाढले होते ते २००७-०८ मध्ये ८.७ टक्क्यांनी वाढेल अशी अपेक्षा आहे. या तुलनेत १९९९-२००० च्या स्थिर किंमतीनुसार महाराष्ट्राचे स्थूल राज्य उत्पन्न आधीच्या वर्षीच्या ९.७ टक्के वाढीच्या तुलनेत २००७-०८ मध्ये ९ टक्क्यांनी वाढण्याची अपेक्षा आहे.

**राज्याचे उत्पन्न.** ३. सन्माननीय सदस्यांना महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २००७-०८ हे प्रकाशन उपलब्ध करुन देण्यात आले आहे. प्रचलित किंमतीनुसार २००६-०७ मध्ये राज्याचे निव्वळ उत्पन्न ४,३७,०३५ कोटी रुपये असून, ते २००५-०६ मधील राज्य उत्पन्नापेक्षा १६.३ टक्क्यांनी जास्त होते. दरडोई राष्ट्रीय उत्पन्न सन २००७-०८ मध्ये ३३,१३१ रुपये इतके अंदाजण्यात आले आहे तर महाराष्ट्राचे दरडोई राज्य उत्पन्न रुपये ४६,२६९ इतके आहे.

**किंमती निर्देशांक.** ४. अखिल भारतीय घाऊक किंमतीच्या निर्देशांकावर आधारित वार्षिक चलन वाढीचा दर जानेवारी, २००७ साठी ६.२ टक्के होता तो जानेवारी, २००८ मध्ये घटून ३.९ टक्क्यांवर आला. एप्रिल, २००७ ते जानेवारी, २००८ या कालावधीकरिता चलन वाढीचा दर ४.२

टक्के इतका राहिला. तो आधीच्या वर्षाच्या तत्सम कालावधीकरिता ५.२ टक्के होता.

**औद्योगिक उत्पादनाचा निर्देशांक.**

५. एप्रिल ते डिसेंबर, २००७ या कालावधीकरिता अखिल भारतीय औद्योगिक उत्पादनाचा सरासरी निर्देशांक २६१.४ होता. त्यात मागील वर्षाच्या तुलनेत ९ टक्के एवढी वाढ झाली. तसेच वस्तू निर्माण क्षेत्राच्या तत्सम कालावधीतील निर्देशांकामधील ही वाढ ९.६ टक्के होती.

**राजकोषिय स्थैर्यता.**

६. राज्याच्या आर्थिक परिस्थितीत लक्षणिय स्थैर्य आले असून, सन २००६-०७ मधील महसुली आधिक्याप्रमाणे सन २००७-०८ या वर्षात देखील महसुली आधिक्य राहिले. सन २००८-०९ मध्ये कर्ज व व्याजाची परतफेड याचे महसुली जमेशी प्रमाण २१.१४ टक्के इतके अंदाजित करण्यात आले आहे. सन २००३-०४ मध्ये कर्ज व व्याजाची परतफेड याचे महसुली जमेशी प्रमाण ४०.०६ टक्क्यांवर पोहचले होते. महसुली जमेच्या तुलनेत कर्जाची टक्केवारी ही सन २००३-०४ मध्ये असलेल्या २८४ टक्क्यांवरुन २००६-०७ मध्ये २१५ टक्के इतकी कमी झाली आहे. हे प्रमाण २०० टक्के किंवा त्याहून कमी असणे हे राज्याच्या चांगल्या आर्थिक परिस्थितीचे लक्षण मानले जाते, सन २००८-०९ मध्ये महाराष्ट्रासाठी हे प्रमाण १९८ टक्के इतके अपेक्षित आहे.

६.१ शासनाच्या कर्जाच्या हमीच्या अधिक चांगल्या व्यवस्थापनामुळे सन २००३-०४ मधील एकूण रुपये ७०,१२५ कोटी इतकी जास्त असलेली शासन हमी सन २००७-०८ अखेर अंदाजे रुपये ३६,८०० कोटी पर्यंत कमी झाली आहे.

६.२ महसुली जमेमध्ये सन २००४-०५ ते २००८-०९ या कालावधीत १८.१५ टक्के इतक्या वार्षिक सरासरी वृद्धी दराने वाढ

झाली आहे. त्याच कालावधीत योजनेतर खर्चातील वाढ ६.३६ टक्के इतक्या वार्षिक सरासरी दराने नियंत्रित ठेवली असल्याने राज्याच्या योजनेच्या आराखड्यात भरीव वाढ करता आली.

**६.३.** मला येथे नमूद करणे आवश्यक वाटते की, सन २००८-०९ चा अर्थसंकल्प तयार करतांना, शासनाने आगामी वेतन आयोगाच्या शिफारशींच्या संभाव्य परिणामांचाही विचार केला आहे. राजकोषिय निर्देशांकावर कोणताही दुष्परिणाम न होऊ देता आणि विकासविषयक खर्चात कपात होऊ न देता हे एक मोठे आव्हान आहे, याची मला जाणीव आहे.

**योजनेतर महसूली खर्चावर नियंत्रण.**

**७.** मागील वर्षाचा अर्थसंकल्प सादर करतांना मी सन २००७-०८ मध्ये महसुली जमेच्या तुलनेत ८२.४७ टक्के इतका योजनेतर महसुली खर्च अंदाजित केला होता. खर्चावरील योग्य नियंत्रणामुळे हे प्रमाण आता ८०.३० टक्के पर्यंत नियंत्रित करण्याचे अंदाजित करण्यात आले आहे. आगामी वेतन आयोगाच्या अहवालामुळे करावयाची अतिरिक्त तरतूद विचारात घेऊन देखील सन २००८-०९ मध्ये महसुली जमेच्या तुलनेत योजनेतर महसुली खर्च ८०.४६ टक्के इतका अंदाजित करण्यात आला आहे. मागील काही वर्षात वेतन, निवृत्तीवेतन आणि व्याज यावरील एकत्रित खर्च सन २००४-०५ मधील ७५.०३ टक्क्यांवरुन सन २००७-०८ मधील सुधारित अंदाजनुसार ५९.०७ टक्के इतका कमी झाला असून त्यात सन २००८-०९ मध्ये ६४.१९ टक्क्यापर्यंत वाढ अंदाजित करण्यात आली आहे.

**एकुण खर्चाच्या तुलनेत योजनांतर्गत खर्चाची टक्केवारी.**

**८.** एकूण खर्चाच्या तुलनेत योजनांतर्गत खर्चाचे प्रमाण सन २००२-०३ ते सन २००४-०५ मध्ये सरासरी १६ टक्के इतके कमी होते. हे प्रमाण सन २००७-०८ मध्ये २४.७१ टक्के इतके अंदाजित आहे त्यात सन २००८-०९ मधील एकूण खर्चाच्या तुलनेत २६.७६ टक्के इतकी वाढ होण्याची अपेक्षा आहे.

**महसुली आधिक्याचा अर्थसंकल्प.** **९.** मला सभागृहास सांगण्यास आनंद होत आहे की, सन २००६-०७ या वर्षाच्या शेवटी प्रत्यक्षात रुपये ८१० कोटी इतके महसुली आधिक्य आले आहे. सन २००७-०८ या वर्षा अखेरीस रुपये २७५९ कोटी इतके आधिक्य अपेक्षित आहे. सन २००८-०९ या वर्षाकरिता रुपये ९६४.७० कोटी इतके महसुली आधिक्य अर्थसंकल्पीत करण्यात आले आहे.

**राज्याचा स्वत:चा कर महसूल.** **१०.** राज्याचे स्वत:चे सन २००७-०८ चे कर महसुली उत्पन्न राज्य स्थूल उत्पन्नाच्या वाढीपेक्षा अधिक प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. सन २००७-०८ च्या सुधारित अंदाजानुसार राज्याची स्वत:ची महसुली जमा रुपये ४६,६१२ कोटी अंदाजित आहे व त्याची वाढ मागील वर्षाच्या तुलनेत १६.२५ टक्के इतकी आहे. दिनांक १ एप्रिल २००७ पासून केंद्रीय विक्रीकराच्या दरात घट झाली नसती तर या महसुली जमेत आणखी वाढ झाली असती. दिनांक १ एप्रिल २००८ पासून केंद्रीय विक्रीकराच्या दरात ३ टक्क्यावरुन २ टक्के इतकी घट होणार असून देखील राज्याच्या स्वत:च्या कर महसुली जमेमध्ये ११.३३ टक्के वाढ असुन सन २००८-०९ मध्ये रुपये ५१,८९३ कोटी इतकी अंदाजित आहे.

**अर्थसंकल्प वितरण पध्दती.** **११.** मला सभागृहास सांगण्यास विशेष आनंद होत आहे की, विभागांना मंजूर मासिक निधी वितरण पद्धतीनुसार निधी खर्च करण्यास पूर्ण स्वातंत्र्य देण्यात आले आहे.

**११.१** आगामी वर्षात संगणकीकृत अर्थसंकल्प वितरण पद्धतीद्वारे कोणत्याही महिन्यातील अखर्चित रक्कम डिसेंबर, २००८ पर्यंत वापरता येऊ शकेल.

**११.२** याशिवाय काही योजनांकरिताच्या निधी वितरणात वर्षभरात केंव्हाही बदल करता येऊ शकेल. यात स्थानिक क्षेत्र विकास योजना,

विकास मंडळाच्या योजना, सर्व केंद्र पुरस्कृत योजना, नैसर्गिक आपत्ती करिता आवश्यक निधी, रोजगार हमी योजना आणि विधानमंडळाच्या सदस्यांना देण्यात येणारी सर्व अनुदाने इत्यादीचा अंतर्भाव आहे.

**११.३** प्रायोगिक तत्वावर अशी अर्थसंकल्प वितरण पद्धत अंमलात आणणारे महाराष्ट्र हे पहिलेच राज्य आहे. सुरवातीच्या काही अडचणींनंतर ही पद्धत आता यशस्वीपणे स्थिरावली आहे.

**वार्षिक योजना २००८-०९.**

**१२.** वार्षिक योजना सन २००८-०९ बाबत योजना आयोगाशी झालेल्या चर्चेच्या आधारे या वर्षाच्या योजनेचे आकारमान रुपये २५,००० कोटी निश्चित करण्यात आले आहे. सदर एकूण नियतव्ययापैकी रुपये २२७१४.१३ कोटी नियतव्यय त्या त्या क्षेत्राखाली अर्थसंकल्पीय करण्यात आला आहे. आणि उर्वरित रुपये २२८५.१७ कोटींचा नियतव्यय नियोजन विभागांतर्गत ठोक तरतूद म्हणून अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे.

**१२.१** सन २००८-०९ च्या वार्षिक योजनेतील प्रस्तावित नियत व्यय हा राज्याच्या साधनसंपत्तीशी सुसंगत असून, ही योजना मागील तीन वर्षांप्रमाणे वास्तववादी आहे.

**कृषी गृहनिर्माण जलसंधारण व जलसिंचन क्षेत्रावर भर.**

**१३.** सन २००८-०९ च्या वार्षिक योजनेत कृषी विकासाच्या दराकडे विशेष लक्ष देऊन कृषी व जलसंधारण क्षेत्राकरिता भरीव तरतूद केली आहे. यामुळे कृषी उत्पादनाच्या दरात जलद गतीने वाढ होईल. जलसिंचन क्षेत्राकरिता रुपये ५,९५५ कोटी इतका निधी देण्याचे निश्चित केले असून, त्यापैकी रुपये ५,९१६ कोटी अर्थसंकल्पीत करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे नगरविकास व गृहनिर्माण क्षेत्रासाठीच्या योजनेचे आकारमान वाढविले आहे. गृहनिर्माण क्षेत्राकरिताचा नियतव्यय रुपये ६११ कोटींवरुन रुपये १,९०५ कोटी तर, नगर विकासाकरिताचा नियतव्यय रुपये २,२५९ कोटींवरुन रुपये

२,७९५ कोटी इतका वाढविण्यात आला आहे. विमुक्त जाती आणि जमाती, इतर मागासवर्गीय आणि अपंगांच्या कल्याणाकरिताचा नियतव्यय ५० टक्क्यांनी वाढविण्यात आला आहे.

**जिल्हा योजनेकरिता भरीव तरतूद.**

**१४.** मला या सभागृहास सांगण्यास आनंद होत आहे की, जिल्हा योजनेसाठी सन २००७-०८ या वर्षाकरिता रुपये १,०८० कोटी इतकी तरतूद होती, सन २००८-०९ या वर्षात ह्यात जवळ जवळ दुपटीने वाढ करुन ही तरतूद रुपये २,००० कोटी करण्यात आली आहे. मी स्वत: राज्यातील बहुतांश जिल्ह्यांत भेट देऊन जिल्हा योजनेतील योजनांचा आढावा घेतला असून, लघुसिंचन, पाणी पुरवठा, तंत्रशिक्षण आणि जलसंधारण इत्यादी कामे पूर्ण करण्याकरिता स्थानिक गरजेनुसार आवश्यक तो निधी उपलब्ध करुन दिला आहे. मला विश्वास आहे की, यामुळे जिल्ह्याच्या एकूण विकासात जिल्हा नियोजन समितीचा सहभाग दूरगामी परिणाम करणारा ठरेल.

**जिल्हा योजना अर्थसंकल्पीत करण्याची नवीन पध्दत.**

**१५.** जिल्हा नियोजन समितीद्वारा संमत जिल्हा योजनेची वेळेवर अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने अर्थसंकल्पीय पद्धत, अनुदानाचे वितरण आणि प्रशासकीय मान्यता प्रदान करणे इत्यादी बाबतीत अमूलाग्र बदल करण्यात आला आहे. यापुढे जिल्हा योजना ही थेट अर्थसंकल्पीत करण्यात येईल व अर्थसंकल्पीत रक्कम संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांमार्फत संबंधित योजना राबविणाऱ्या यंत्रणेकडे देण्यास्तव सोपविण्यात येईल. जिल्हा परिषद किंवा नागरी स्वराज्य संस्थेव्यतिरिक्त इतर योजनांच्या अंमलबजावणीकरिता प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांकडे असतील. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अधिकार अबाधित असतील. जिल्हा योजनेतंर्गत करण्यात येणारे पुनर्विनियोजन हे नेहमीच्या अटींच्या अधीन राहून जिल्हा नियोजन समितीच्या मान्यतेने जिल्हाधिकाऱ्यांना करता येईल. यामुळे जिल्हा योजनेची अंमलबजावणी जलद गतीने

व वेळेवर होईल व त्याचप्रमाणे जिल्ह्यासाठी उपलब्ध नियतव्ययाचा संपूर्ण वापर होईल, असा मला विश्वास आहे.

अनुशेष. **१६.** जलसिंचन क्षेत्र वगळता आठ विकास क्षेत्रांचा अनुशेष दूर करण्याकरिता गेल्या तीन-चार वर्षात रुपये १,४०० कोटी च्या दरम्यान नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात आला आहे. काही क्षेत्रातील खर्च चांगला झाला आहे. मी अनुशेष निर्मुलन कामांना गती देण्याकरिता नुकतीच आढावा बैठक घेतली आहे. अनुशेषापैकी पाणी पुरवठा विकास क्षेत्राचा अनुशेष दूर झाला आहे. पशुवैद्यकीय सेवा व शिक्षण विकासाचा अनुशेष जवळपास दूर झाला आहे आणि शालेय शिक्षण विकासांतर्गतचा अनुशेष वगळण्याबाबत मा. राज्यपाल यांच्याकडे विनंती करण्यात आली आहे. सन २००८-०९ या वर्षाकरिता उरलेल्या क्षेत्रातील अनुशेष दूर करण्याकरिता रुपये १,४०० कोटी इतका नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात आला आहे. यात आरोग्य क्षेत्राकरिता रुपये ६३९ कोटी, कृषी पंपांच्या विद्युतीकरणाकरिता रुपये ३७२ कोटी, तंत्रशिक्षणाकरिता रुपये १०८ कोटी तर मृद व जलसंधारणाकरिता रुपये १३१ कोटी इतक्या नियतव्ययाचा समावेश आहे.

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान. **१७.** अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान हा कार्यक्रम सन २००७-०८ या वर्षापासून राज्यातील ८ जिल्ह्यात गहू, ६ जिल्ह्यात भात व १८ जिल्ह्यात कडधान्य या पिकांचे उत्पन्न वाढविण्यासाठी राबविण्यात येत आहे. या अभियांनातर्गत या पिकांची उत्पादकता व उत्पादनात वाढ करणे, शेत जमिनीची सुपिकता वाढविणे व शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे ही उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

राष्ट्रीय कृषी विकास योजना. **१८.** राष्ट्रीय विकास परिषदेच्या ५३ व्या बैठकीत पारित करण्यात आलेल्या ठरावानुसार केंद्र शासनाने कृषी व कृषी निगडीत क्षेत्राच्या विकासासाठी ११ व्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत राष्ट्रीय कृषी

विकास योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या अनुषंगाने राज्याने कृषी व कृषीनिगडीत क्षेत्रासाठी ४.४ टक्के दराने वार्षिक वाढ करण्याचे उद्दिष्ट्य निश्चित केले आहे. याकरिता हवामान, उपलब्ध तंत्रज्ञान आणि नैसर्गिक साधनसंपत्ती विचारात घेऊन जिल्हा व राज्यस्तरावर कृषी विकास आराखडे तयार केले जाणार आहेत. या योजने अंतर्गत केंद्र शासनाकडून डिसेंबर, २००७ पर्यंत रुपये १२८ कोटीचा निधी राज्यास प्राप्त झालेला आहे.

**राष्ट्रीय फलोत्पादन अभियान.**

**१९.** गेली दोन दशके महाराष्ट्र हे फलोत्पादनात आघाडीवर आहे. राष्ट्रीय फलोत्पादन अभियानामुळे फलोत्पादनास अधिकच गती मिळाली आहे. या अभियानाअंतर्गत आंबा, द्राक्ष, व डाळींब निर्यातीसाठी शेतकऱ्यांना योग्य प्रशिक्षण देणे, समूह मशागतीचे तंत्रज्ञान, हरितगृहामध्ये फळभाज्या व पुष्पोत्पादन तसेच तंत्रज्ञान, प्रशिक्षण व शेतीशाळांमार्फत सहभाग इत्यादींचा समावेश होतो. या प्रयोजनार्थ सन २००८-०९ या वर्षाकरिता रुपये ३५ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**सेंद्रिय शेती अभियान.**

**२०.** राज्य शासनाव्दारे सेंद्रिय शेती प्रकल्प राबविण्यात येत आहे. सेंद्रिय शेतीमुळे शेतकऱ्यांना खर्च कमी येतो, जमीनीचा पोत सुधारतो व उत्पादनांना बाजारात जास्त भाव मिळतो. आतापर्यंत या प्रकल्पांतर्गत १.१४ लक्ष हेक्टर इतक्या क्षेत्रात सेंद्रिय शेती करण्यात आली असून, सन २००८-०९ या वर्षासाठी सुमारे १५,००० हेक्टरचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. सन २००८-०९ या वर्षाकरिता रुपये ७.९५ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**सुक्ष्म सिंचन.**

**२१.** उपलब्ध व सिमित जल साठ्याचा कमाल वापर करण्याची निकड लक्षात घेवून केंद्र शासन पुरस्कृत सूक्ष्म सिंचन योजना राज्यात सन २००५-०६ पासून राबविण्यात येत आहे. आतापावेतो सुमारे ६.५१ लक्ष हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले असून, सन २००८-०९

या वर्षाकरिता १.३० लक्ष हेक्टरचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. या प्रयोजनार्थ सन २००८-०९ या वर्षाकरिता रुपये १५.४६ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे. आवश्यकतेनुसार अधिकचा निधी या योजनेस उपलब्ध करुन देण्यात येईल.

दुधाची दरवाढ.

२२, दूध उत्पादकांच्या मागण्या विचारात घेऊन शासनाने दिनांक ७ नोव्हेंबर, २००७ पासून गायीच्या दुधाच्या दरात रुपये १.५० प्रतिलिटर व म्हशीच्या दुधाच्या दरात रुपये २ प्रतिलिटर अशी वाढ केली आहे. या निर्णयाचा फायदा राज्यातील लाखो दुग्धउत्पादकांना होईल व त्यामुळे दुग्धविकासास मोठी चालना मिळेल असा मला विश्वास आहे.

पंतप्रधान पॅकेज.

२३. पंतप्रधान पॅकेज अंतर्गत विदर्भातील सहा जिल्ह्यात दुग्धव्यवसायाच्या पायाभूत सुविधेच्या बळकटीकरणाचा कार्यक्रम महानंदा मार्फत राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत रुपये ७०.२२ लक्ष इतका निधी खर्च करण्यात येऊन १० शितकरण केंद्राची उभारणी केली आहे व उर्वरित ३० शितकरण केंद्र उभारण्याची कार्यवाही करण्यात येईल.

विदर्भ व मराठवाडा पॅकेज.

२४. विदर्भ व मराठवाडा पॅकेज अंतर्गत ५० टक्के अनुदानावर दुधाळ जनावरे वाटप व खाद्य पुरवठा हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. डिसेंबर, २००७ अखेर विदर्भ व मराठवाड्यात अनुक्रमे रुपये ७.२० कोटी इतका निधी खर्च करुन ७,९६४ गायी व रुपये ३.२८ कोटी इतका खर्च करुन २,८११ गायींचे वाटप करण्यात आले आहे.

मत्स्यव्यवसाय.

२५. अकराव्या योजनेत मत्स्यव्यवसाय क्षेत्राकरिता रुपये २३३.८४ कोटी इतका नियतव्यय संमत असून सन २००७-०८ या वर्षाकरिता राज्य हिश्श्यापोटी रुपये ३८.८२ कोटी व केंद्र हिश्श्याकरिता रुपये ३३.५२ कोटी इतका नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात आला आहे. मत्स्यव्यवसाय क्षेत्राकरिता सन २००८-०९ या वर्षाकरिता रुपये ४०.०५ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**भूजलाशयीन मत्स्यबीज संचयन.** २६. राज्यातील ४२ मत्स्यबीज उत्पादन केंद्रमधून १७.५५ कोटी इतकी मत्स्यबीज निर्मिती झाली. भूजलाशयीन क्षेत्रामध्ये गोड्या पाण्यांतील कोळंबी संवर्धन वेगाने लोकप्रिय होत आहे. त्यासाठी कोळंबीबीजाची गरज भागविण्यांकरीता ४ कोटी मत्स्योत्पादन क्षमतेचे केंद्र दापचरी, जिल्हा ठाणे येथे उभारण्यांत आले असून कोळंबीबीज निर्मिती आगामी आर्थीक वर्षात होईल.

**सागरी मत्स्यव्यवसाय बंदर व जेट्टी विकास.** २७. मच्छिमार बंदरांवर मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी ९२ कामे करण्यांत आली आहेत. राज्याच्या सागरी किनाऱ्यावर १८४ मासळी उतरविण्यांच्या केंद्रापैकी ५१ ठिकाणी बंदरे व जेट्टीचा कार्यक्रम हाती घेण्याचे ठरविण्यात आले त्यापैकी १८ कामे प्रगतीपथावर आहेत.

**मच्छिमारांना सहाय्य.** २८. मासेमारी संकट निवारण निधी योजनेतंर्गत मासेमारी करतांना मच्छिमारांचा अपघाती मृत्यू अथवा बेपत्ता झाल्यास त्यांच्या वारसांना रुपये ५०,००० इतके अर्थसहाय्य देण्यात येते. सदर अर्थसहाय्य रुपये १ लक्ष पर्यंत वाढविण्याचे मी ठरविले आहे.

**व्याज माफी.** २९. विदर्भातील सहा जिल्ह्यातील अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांसाठी पुनर्बांधणी केलेल्या कर्जावरील रुपये ८२८ कोटी व्याज सन २००६-०७ व २००७-०८ या दोन वर्षात माफ करण्यात आले आहे, त्यात राज्याचा हिस्सा रुपये ४१४ कोटीचा आहे.

**सवलतीच्या व्याज दरात पीक कर्ज.** ३०. राज्य शासनाने २००७-०८ या वर्षात शेतकऱ्यांना ६ टक्के इतक्या सवलतीच्या व्याजदराने पीक कर्ज देण्याकरिता रुपये १३० कोटी इतका निधी उपलब्ध करुन दिला आहे. ही योजना सन २००८-०९ या वर्षातही सुरु ठेवण्यात येईल.

**शेतकऱ्यांची कर्जमाफी.** ३१. राज्य शासनाने राज्यातील कर्जग्रस्त शेतकऱ्यांच्या कर्ज माफीसाठी केंद्र शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला आहे. केंद्र शासनाने नुकत्याच जाहिर केलेल्या अंदाजपत्रकात देशातील शेतकऱ्यांचे

६०,००० कोटीचे कर्ज माफ करण्याचा ऐतिहासिक निर्णय घोषित केला आहे. या निर्णयाचा फायदा महाराष्ट्रातील अडचणीत सापडलेल्या लाखो शेतकऱ्यांना होणार आहे. या ऐतिहासिक निर्णयामुळे राज्यातील शेतकऱ्यांना भविष्यात कर्ज मिळण्याचा मार्ग खुला झाला आहे व कृषि क्षेत्राच्या किमान ४ टक्के विकास वाढीचा चर करण्याच्या केंद्र शासनाच्या निर्णयास चालना मिळालेली आहे. हे ऐतिहासिक पाऊल उचलल्या बद्दल मी राज्यातील शेतकऱ्यांच्या वतीने केंद्र सरकारचे मनपुर्वक अभिनंदन करीत आहे.

**३१.१.** या योजनेचा तपशील व लाभधारक अद्यापी जाहीर व्हावयाचा असून राज्य शासन या योजनेची यथोचित अंमलबजावणी करेल व राज्यातील अडचणीत आलेल्या शेतक-यास मदत करण्यास कोणतीही कसर ठेवणार नाही अशी मी ग्वाही देतो.

**डॉ. पंजाबराव देशमुख व्याज अनुदान योजना.**

**३२.** केंद्र शासनाच्या कर्जमाफीच्या निर्णयामुळे राज्यातील लाखो शेतक-यांना नवसंजीवनी मिळाली आहे. त्याच बरोबर वेळेवर कर्ज परत फेडणाऱ्या शेतकऱ्यांचे हित जाणणे आवश्यक आहे. डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेंतर्गत त्रिस्तरीय सहकारी यंत्रणेकडून रुपये २५,००० पर्यन्त अल्पमुदतीचे पीक कर्ज घेणाऱ्या आणि वेळेवर परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ४ टक्के व्याजाची सवलत आहे, तर रुपये २५,००० ते रुपये ३ लक्ष पर्यन्त अल्प मुदत पीक कर्ज घेवून पतरफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना २ टक्के व्याज सवलत आहे. या प्रयोजनार्थ सन २००८-०९ या वर्षासाठी रुपये ६३.६४ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित आहे. राज्य स्तरावर या व्यतिरिक्त रुपये २०४ कोटी इतकी तरतूद करुन या योजनेंतर्गत सर्व प्रलंबित अनुदान लवकरच देण्याचे मी घोषित करतो. सहकारी संस्थांचे कर्ज परतफेड करणा-या शेतक-यांचा उत्साह यामुळे द्विगुणीत होईल अशी मला खात्री आहे.

वैद्यनाथन समितीचा अहवाल.

३३. वैद्यनाथन समितीचा अहवाल स्वीकारण्यात आला असून, समितीच्या शिफारशीनुसार सहकार कायद्यात बदल करण्यासाठी अध्यादेश निर्गमित करण्यात आला आहे. यात संरचनात्मक, कायदेविषयक सुधारणा व आर्थिक सुधारणा यांच्या अंमलबजावणीची गरज आहे. या प्रयोजनार्थ सन २००८-०९ या वर्षाकरिता रुपये ११.५० कोटी इतका निधी प्रस्तावित असून रुपये १०० कोटी अतिरिक्त निधी सन २००८-०९ मध्ये उपलब्ध करून देण्यात येईल.

हंगाम २००६-०७ मध्ये गाळपाविना शिल्लक ऊसासाठी ऊस उत्पादकांना सवलत.

३४. सन २००६-०७ या वर्षात ऊसाचे व साखरेचे भरघोस उत्पादन झाल्यामुळे वाढीव गाळप हंगामाव्यतिरिक्त काही ऊस गाळपाविना शिल्लक राहिला आहे. ऊस उत्पादकांना व साखर उद्योगास दिलासा देण्याकरिता शासनाने खालील उपाययोजना अंमलात आणल्या आहेत.

(अ) गाळपाविना शिल्लक राहिलेल्या ऊसाकरिता रुपये २५,००० प्रतिहेक्टर या दराने रुपये ४८ कोटी इतक्या रकमेचे आर्थिक मदत देण्यात आली.

(ब) ऊसाच्या गाळपापोटी विहित साखर उताऱ्यापेक्षा प्रत्येक एक टक्का साखर उतारा घटीस रुपये १३० प्रतिटन प्रमाणे साखर उतारा घट अनुदान व ५० किलोमिटरच्या पुढील अंतरास २५० किलोमिटर पर्यंत सरसकट रुपये २ प्रति मेट्रिक टनप्रमाणे वाहतूक अनुदान देण्याकरिता रुपये ७५ कोटी इतका निधी देण्यात आला.

(क) साखर निर्यातीकरिता रुपये १,००० प्रति मेट्रिक टन या दराने अनुदान देण्यासाठी रुपये २५ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

बगॅस आधारित वीज निर्मिती.

३५. राज्य शासनाचा नवीन अपारंपारिक ऊर्जा धोरण जाहीर करण्याचा मानस आहे. त्यामुळे अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतात वाढ

होईल. शासनाने यापूर्वीच सहकारी साखर कारखान्यांमार्फत बगॅस आधारित वीज निर्मिती करण्याबाबतचे धोरण जाहीर केले आहे. या कारखान्यांकडून अतिरिक्त १,००० मेगावॉट वीज निर्मिती अपेक्षित आहे. अपारंपारिक ऊर्जा क्षेत्राकरिता सन २००८-०९ या वर्षासाठी रुपये १८ कोटी प्रस्तावित असून, रुपये ३० कोटी अतिरिक्त नियतव्यय उपलब्ध करून देण्यात येईल.

**साखर कारखान्यांकरिता अतिरिक्त नियतव्यय.**

३६. उभारणाखाली असलेल्या साखर कारखान्यांना शासकीय भागभांडवलापोटी रुपये २० कोटी इतका नियतव्यय उपलब्ध करून देण्यात येईल.

**अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या भागभांडवलात वाढ.**

३७. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अधिकृत भागभांडवल रुपये ५० कोटी इतके आहे. त्यापैकी सन २००७-०८ पर्यंत महामंडळाला रुपये २२.१५ कोटी इतके भागभांडवल देण्यात आले आहे. सदर महामंडळाला सन २००८-०९ मध्ये आणखी रुपये १.६० कोटी इतका निधी भागभांडवली अंशदानाकरिता तरतूद रुपये १० कोटी अतिरिक्त नियतव्यय उपलब्ध करून देण्यात येईल.

**बेरोजगार युवक व युवतीसाठी प्रशिक्षण व स्वयंरोजगार योजना.**

३८. राज्यात बेरोजगारीची समस्या दिवसेंदिवस वाढत असून, रोजगार व स्वयंरोजगार या खात्याकडे रोजगारासाठी नोंदणी केलेल्या उमेदवारांची संख्या ३२ लक्ष आहे. सद्य:स्थितीत औद्योगिक व आर्थिक उदारीकरणाचे धोरण असल्यामुळे औद्योगिक क्षेत्रात व आर्थिक क्षेत्रात झपाट्याने वाढ होत आहे. या क्षेत्रामध्ये मोठ्याप्रमाणात रोजगाराची मागणी आहे व कुशल मनुष्यबळाचा तुटवडा आहे, हे लक्षात घेता अल्प मुदतीचे प्रशिक्षण देऊन अशिक्षित, अल्पशिक्षित व सुशिक्षित उमेदवारांना रोजगारक्षम करण्याचे व अशा प्रशिक्षित उमेदवारांना स्वयंरोजगार सुरु करण्यासाठी शासनामार्फत व निरनिराळ्या वित्तीय संस्थांमार्फत अर्थसहाय्य करणे प्रस्तावित आहे.

३८.१ अशिक्षित, अल्पशिक्षित व सुशिक्षित १८ ते ३५ वयोगटातील युवक व युवती या योजनेचा लाभ घेऊ शकतात. मुख्यत: आय.टी.आय.

व्यवसाय प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून हे प्रशिक्षण उपलब्ध करुन दिले जाईल. प्रशिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क, विद्यावेतन, टुलकिट या सर्वांसाठी प्रति लाभार्थी जास्तीत जास्त रुपये ७,००० ची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

**माहितीचा अधिकार कायदा.** **३९.** महाराष्ट्र शासनाने मुंबईसह औरंगाबाद, नागपूर, पुणे, नाशिक, नवी मुंबई, अमरावती आणि बृहन्मुंबईकरिता राज्य माहिती आयोग कार्यालयांची स्थापना केली आहे.

**३९.१** या अधिनियमातंर्गत सर्व माहिती अधिकारी व सहाय्यक माहिती अधिकारी यांना यशदा, पुणे मार्फत प्रशिक्षण देण्यात येत आहे. सन २००७-०८ मध्ये १२,५०० अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणाकरिता यशदाला रुपये १.१३ कोटी इतके अनुदान देण्यात आले आहे.

**डॉ.चिंतामण द्वारकानाथ देखमुख यांचे स्मारक.** **४०.** थोर अर्थतज्ञ व भारताचे पहिले अर्थमंत्री डॉ.सी. डी. देखमुख यांच्या जन्मगावी तळा, जि. रायगड येथे यथोचित स्मारक उभे करण्यात येईल त्यासाठी सन २००८-०९ या वित्तीय वर्षात निधी उपलब्ध करुन देण्याचा मानस आहे.

**साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक ट्रस्ट, रायगड या संस्थेस सहाय्य.** **४१.** महाराष्ट्र शासन, साने गुरुजी यांचे विचारप्रेमी आणि शालेय विद्यार्थी यांच्या आर्थिक सहभागातून वडघर-गोरेगांव, जिल्हा रायगड येथे साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक उभे राहत आहे. साने गुरुजी जीवनदर्शन केंद्र आणि आंतरभारती अनुवाद सुविधा केंद्र अशा दोन प्रकल्पांच्या बांधकामाकरिता शासन आवश्यक ती मदत उपलब्ध करून देईल.

**राज्याचे गृहनिर्माण विषयक धोरण.** **४२.** राज्य शासनाने गृहनिर्माण विषयक धोरण दिनांक २३ जुलै, २००७ रोजी प्रसिद्ध केले आहे. या गृहनिर्माण धोरणामध्ये विशेष नगर वसाहत योजनेसंबंधी तरतुदी, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्विकासाची योजना, नागरी नुतनीकरणासाठी सामुहिक विकास योजना, पुनर्विकास प्रकल्पाकरिता संयुक्त योजना, म्हाडाच्या

जुन्या वसाहतींचा पुनर्विकास, गावठाणांचा पुनर्विकास आणि आराखड्यामध्ये सक्तीने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक अल्प उत्पन्न गट व मध्यम उत्पन्न गटांसाठी सदनिकांचे आरक्षण, तसेच नियामक आयोगाची स्थापना या उपाययोजनांचा समावेश करण्यात आलेला आहे.

**एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम.**

**४३.** केंद्र शासनाने एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमासाठी जानेवारी, २००८ अखेर रुपये १०१ कोटी इतकी रक्कम मंजूर केली आहे. राज्य शासनाने केंद्र व राज्य हिश्श्यापोटी रुपये ५३.७८ कोटी केंद्र इतकी रक्कम म्हाडास वितरित केली आहे. केंद्र शासनाने मंजुरी दिलेल्या २९,२६५ घरापैकी ६० टक्के घरे दिनांक ३१ ऑगस्ट, २००८ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठरवून देण्यात आले आहे.

**शहरी गरिबांना मुलभूत सुविधा पुरविणे.**

**४४.** केंद्र शासनाने सन २००७-०८ या वित्तीय वर्षात रुपये १३५ कोटी इतकी रक्कम उपलब्ध करुन दिलेली असून, राज्य हिश्श्यासह रुपये २८७.५८ कोटी इतकी रक्कम महाराष्ट्र गृहनिर्माण आणि विकास प्राधिकरणास वितरित करण्यात आली आहे.

**४४.१** या योजनेंतर्गत केंद्र शासनाने मंजुरी दिलेल्या १,३५,१९० घरापैकी ३,३३८ घरांची कामे प्रगतीपथावर आहेत. मंजूर घरांपैकी ६० टक्के घरे दिनांक ३१ ऑगस्ट २००८ पर्यंत पूर्ण करण्याबाबत उद्दिष्ट ठरवून देण्यात आले आहे.

**घरकुल कार्यक्रम.**

**४५.** कमी उत्पन्न गट व मध्यम वर्गाकरिता परवडणाऱ्या सदनिका उपलब्ध करुन देण्याच्या महत्वाकांक्षी कार्यक्रमांतर्गत १० लक्ष सदनिका व घरकुले बांधण्याचा कार्यक्रम शासनातर्फे पुढील दोन वर्षात राबविण्यात येईल. या कार्यक्रमांतर्गत, इंदिरा आवास योजनेंतर्गत २.५० लक्ष, राजीव गांधी ग्रामीण निवारा प्रकल्पांतर्गत २.५० लक्ष,

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियानांतर्गत २.५० लक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत १.५० लक्ष व म्हाडातर्फे १ लक्ष सदनिका व घरकुले बांधण्यात येतील. या कार्यक्रमाचा लाभ ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखाली राहणाऱ्या कुटुंबियांना तसेच शहरी भागातील झोपडपट्टीवासियांना आणि कमी उत्पन्न गट व मध्यमवर्गाला मोठ्या प्रमाणावर होईल. हा कार्यक्रम राबविण्याकरिता केंद्र शासनातर्फे प्राप्त होणाऱ्या निधी व्यतिरिक्त राज्य शासनाच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील जमिनीवर बाजारभावाच्या २५ टक्के अधिमुल्य आकारण्यात येईल आणि म्हाडा वसाहतींना अडीच चटई निर्देशांक अनुज्ञेय केला जाईल. या दोन्ही उपाययोजनांमुळे प्राप्त होणारा निधी वर नमूद केलेल्या घरकूल कार्यक्रमावरच खर्च केला जाईल

**४५.१** तसेच महाराष्ट्रातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील बहुतांश व्यक्तींना राहण्यासाठी व्यवस्थित घरे उपलब्ध नाहीत. ही बाब विचारात घेता सामाजिक न्याय विभागांतर्गत नवीन महत्वाकांक्षी घरकूल योजना प्रस्तावित करण्यात येत असून या योजनेंतर्गत ग्रामीण व शहरी भागातील अनुसूचित जातीच्या व्यक्तींना नवीन घर बांधण्यासाठी रुपये ३०० काटी खर्च करून सुमारे ४०,००० घरे उपलब्ध होतील अशी आशा आहे.

**म्हाडा वसाहतींना अतिरिक्त चटई निर्देशांक देण्याबाबत.**

**४६.** कमी उत्पन्न गट व मध्यम वर्गाकरिता म्हाडा वसाहतींमध्ये परवडणाऱ्या सदनिका उपलब्ध करुन देण्यामध्ये शासनाने प्रमुख भूमिका अदा केली आहे. मुंबई व महाराष्ट्रातील अनेक मोठ्या शहरांमध्ये म्हाडाच्या वसाहती आहेत. या वसाहती अनेक दशकांपूर्वी बांधल्या असून, त्यांनी एक चटई निर्देशांकापेक्षा बराच कमी चटई निर्देशांक वापरला आहे. म्हाडा वसाहतींमध्ये अतिरिक्त चटई निर्देशांक दिल्यामुळे सध्याच्या रहिवाशी कुटुंबियांना मोठ्या सदनिका देणे शक्य

होईल व मोठ्या प्रमाणावर अतिरिक्त नव्या सदनिका बांधणे शक्य होईल.

पोलीस दलाचे आधुनिकीकरण.

**४७.** पोलीस दल आधुनिकीकरणांतर्गत दळणवळण सुविधा, वाहने, शस्त्रास्त्रे, पोलीस गृहनिर्माण, इमारती आणि आधुनिक न्यायसहाय्यक तपासणी सुविधा या बाबींवर सन २००७-०८ या आर्थिक वर्षामध्ये रुपये १५७ कोटी इतका खर्च करण्यात आला आहे. या प्रयोजनार्थ सन २००८-०९ या वर्षाकरिता रुपये १७९.२० कोटी इतका तरतूद प्रस्तावित करण्यात आला आहे.

न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा.

**४८.** दिनांक १ एप्रिल, २००८ पासून अमरावती येथे प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा सुरु करण्यात येत आहे. या प्रयोजनार्थ रुपये ३.५६ कोटी इतका निधी २००८-०९ या वर्षाकरिता उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

पोलीस बलासाठी कार्यालयीन व निवासी इमारतींचे बांधकाम.

**४९.** महाराष्ट्र राज्य पोलीस बलासाठी कार्यालयीन व निवासी इमारती बांधण्याकरिता सन २००७-०८ या वर्षात रुपये १२९.६१ कोटी इतका खर्च करण्यात आला आहे. या प्रयोजनार्थ सन २००८-०९ या वर्षाकरिता रुपये १९५ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

पोलीस दलाचे बळकटीकरण करणे.

**५०.** गृह विभागातंर्गत पोलीस दलासाठी सन २००७-०८ ह्या वर्षात ११,०२१ पदे निर्माण करण्यात आलेली असून, त्यासाठी रुपये १०७ कोटी इतका खर्च झालेला आहे. सन २००८-०९ ह्या आर्थिक वर्षात अशीच ११,०२१ पदे निर्माण करण्यात येणार असून त्यासाठी येणाऱ्या खर्चासाठी पुरेशी तरतूद करण्यात येईल.

महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम.

**५१.** राज्यात महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम दिनांक १५ ऑगस्ट, २००७ पासून सुरु करण्यात आली आहे. मोहिमेस समाजाच्या सर्व स्तरातून व्यापक व उत्साही समर्थन प्राप्त झाले आहे.

लोकसहभागातून तंट्यांचे निराकरण गाव पातळीवर करणे, हे या मोहिमेचे उद्दिष्ट असून यशस्वी गावांना पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. सन २००७-०८ मध्ये रुपये २.५० कोटी खर्च अपेक्षित असून सन २००८-०९ या वर्षाकरिता रुपये ११.११ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**जेष्ठ नागरिकांना प्रवास भाड्यात सवलत.**

**५२.** सध्या ६५ वर्षे वयावरील जेष्ठ नागरिकांना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या साध्या बसेसमधून ५० टक्के प्रवास भाडे सवलत लागू आहे. ही सवलत आता मी निम-आराम गाडीला देखील लागू करत आहे. तसेच ही प्रवास सवलत यापुढे राज्य सरकार किंवा केंद्र सरकार यांच्या ओळखपत्राच्या आधारे देण्यात येईल, त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांना दिलासा मिळेल अशी माझी खात्री आहे.

**केंद्र पुरस्कृत योजना औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील विशिष्ट अभ्यासक्रमाचा खाजगी सहभागाने दर्जावाढ करणे.**

**५३.** देशातील १,३९६ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतील विशिष्ट अभ्यासक्रमांचा शासन व खाजगी क्षेत्राच्या संयुक्त सहभागाने टप्प्याटप्प्याने सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये दर्जावाढ करण्याची योजना केंद्र शासनाने आखली आहे. सन २००७-०८ या वर्षात राज्यातील ५४ संस्थांचा या योजनेत समावेश करण्याचे केंद्र शासनाने निश्चित केले आहे. राज्यातील या योजनेंतर्गत निवड करण्यात आलेल्या प्रत्येक औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला दर्जावाढ करण्यासाठी रुपये २.५० कोटींपर्यंत बिनव्याजी कर्जाऊ रक्कम केंद्र शासनाकडून उपलब्ध करण्यात येणार आहे. या प्रयोजनार्थ सन २००८-०९ या वर्षाकरिता जिल्हा योजना व राज्य योजनेकरिता अनुक्रमे रुपये ३३२.५९ कोटी व रुपये ४०.७६ कोटी असा एकूण ३७०.५५ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**सामाजिक व आर्थिक मागास घटकांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज.**

**५४.** तांत्रिक, वैद्यकीय, कृषी इत्यादी व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी विनाअनुदानित शिक्षण संस्थांकडून आकारले जाणारे शिक्षण शुल्क पाहता सामान्य नागरिकांच्या पाल्यांना एवढे प्रचंड शुल्क भरणे शक्य नाही. विशेषत: विमुक्त भटक्या जाती व जमाती, विशेष मागासवर्ग, इतर मागासवर्ग व आर्थिकदृष्टया मागासवर्ग या

घटकांना तर हे शिक्षण शुल्क भरुन उच्च शिक्षण घेणे फारच कठीण आहे. सध्याच्या तंत्रयुगात व्यावसायिक शिक्षण घेतल्याशिवाय युवकांना रोजगार व स्वयंरोजगार उपलब्ध होणे दुरापास्त आहे. ही वस्तुस्थिती विचारात घेऊन या घटकातील विद्यार्थ्यांना बँकामार्फत सुलभतेने एक खिडकी पद्धतीने शैक्षणिक कर्ज मिळण्यासाठी राज्य शासन व्यवस्था करेल. या घटकातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कर्जावरील व्याज अनुदान स्वरुपात देण्याचे ही मी ठरवले आहे. यामुळे अशा सामाजिक व आर्थिक मागास घटकांतील विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण घेणे व उज्ज्वल भवितव्याकडे वाटचाल करणे सुलभ होईल.

**संत गाडगेबाबा अमरावती वेद्यापीठामध्ये प्रज्ञाचक्षू गुलाबराव महाराज अध्यासन सुरु करणे.**

५५. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठामध्ये प्रज्ञाचक्षू गुलाबराव महाराज अध्यासन सुरु करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. त्यासाठी रुपये १.५० कोटी अनुदान सन २००८-०९ मध्ये उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित आहे.

**उच्च व तंत्रशिक्षणा-करिता अतिरिक्त नियतव्यय.**

५६. उच्च व तंत्रशिक्षणाकरिता सन २००८-०९ या वर्षामध्ये रुपये ५८३ कोटी इतक्या नियतव्यया व्यतिरिक्त रुपये ५० कोटी इतका अतिरिक्त नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात येईल. हा निधी महाविद्यालयातील पायाभूत सुविधा वाढविणे, प्रयोगशाळांचे अद्ययावतीकरण करणे आणि अभियांत्रिकी व व्यवसाय शिक्षण संस्थांच्या सुसज्जीकरणासाठी सुद्धा वापरण्यात येईल.

**कामगिरीची वैशिष्ट्ये.**

५७. शासनाने घोषित केलेल्या विशाल प्रकल्प धोरणाला भरघोस प्रतिसाद मिळत आहे. गेल्या अडीच वर्षाच्या (दिनांक २.६.२००५ ते ३१.१.२००८) काळामध्ये रुपये १,१४,००० कोटी एवढी निश्चित गुंतवणूक असलेले ९२ विशाल प्रकल्प आकर्षित केलेले आहेत.

**महाराष्ट्र राज्यात औद्योगिक क्षेत्रातील गुंतवणूक.**

५८. जानेवारी, २००७ ते डिसेंबर, २००७ या कालावधीत महाराष्ट्र राज्यात औद्योगिक आवेदनपत्रे, इरादापत्रे व १०० टक्के निर्यातिभिमूख घटक यामध्ये ४५४ प्रकल्पांमध्ये रुपये ६२,५८३ कोटी गुंतवणूक करण्यात येत असून, त्याद्वारे २,१८,०४७ रोजगार निर्मिती अपेक्षित आहे.

**सामूहिक प्रोत्साहन योजना.**

५९. मला सांगण्यास आनंद वाटतो की, सामूहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत या वर्षात रुपये ८४४.६२ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यत आला असून, डिसेंबर २००७ अखेर पर्यंतच्या उद्योजकांच्या दाव्यांची प्रतिपूर्ती करण्यात आली आहे. सन २००८-०९ या वर्षाकरीता या प्रयोजनार्थ रुपये ४०० कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**वीज निर्मिती कार्यक्रम.**

६०. विजेची उपलब्धता व मागणी यांच्यातील तफावतीमुळे राज्यातील जनतेला येणाऱ्या अडचणींची शासनास पूर्ण जाणीव आहे. या परिस्थितीवर मात करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत. सध्या २,००० मेगावॅट क्षमतेच्या परळी, पारस व भुसावळ येथील प्रकल्पांची कामे कार्यान्वित आहेत. याशिवाय शासनाने चंद्रपूर येथील वीज निर्मिती केंद्राच्या १,००० मेगावॅट क्षमता वाढीस मंजुरी दिली आहे. कोराडी येथे सुद्धा १,९८० मेगावॅट क्षमतेचा अतिरिक्त संच स्थापित करण्याचे प्रस्तावित केले आहे. पुढील पाच वर्षात महानिर्मिती कंपनीच्या वीज निर्मिती स्थापित क्षमतेमध्ये ६,६५० मेगावॅट इतकी वाढ अपेक्षित आहे. राज्य शासनाने ऊर्जा निर्मितीसाठी आतापर्यंत रुपये ५५० कोटी इतके भागभांडवल उपलब्ध करुन दिले आहे. व्यतिरिक्त ११ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये खाजगी क्षेत्रातील प्रकल्पाकडून ३,००० मेगावॅट वीज उपलब्धतेमध्ये वाढ होईल. यामुळे राज्यातील विजेचा तुटवडा कमी होण्यास मदत होईल.

**कृषी पंपाचे विद्युतीकरण.** ६१. फेब्रुवारी, २००८ अखेर राज्यात एकूण २८.२८ लक्ष कृषी पंपांचे विद्युतीकरण झाले असून, त्याकरिता रुपये १०६.२८ कोटी इतका खर्च झाला आहे. मार्च, २००८ अखेरपर्यंत आणखी १५,००० कृषी पंपांचे विद्युतीकरण होणे अपेक्षित आहे. या प्रयोजनार्थ सन २००८-०९ या वर्षामध्ये रुपये ३७२.४२ कोटी इतका निधी प्रस्तावित करण्यात आला आहे.

**गावठाण फीडर सेपरेशन.** ६२. भारनियमन कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी महावितरण कंपनीने सिंगल फेजींग व गावठाण फिडर सेपरेशन योजना हाती घेतल्या आहेत. पहिल्या टप्प्यामध्ये १५,००० पेक्षा जास्त गावे समाविष्ट केली आहेत. दुसऱ्या टप्प्यामध्ये आणखी १२,६०० गावे समाविष्ट करण्यात येतील. सन २००७-०८ या वर्षात रुपये २१९ कोटी इतका खर्च करण्यात आला आहे.

**ऊर्जा क्षेत्राकरिता अतिरिक्त नियतव्यय.** ६३. उर्जा विभागाच्या नियतव्ययात रुपये १,०५० कोटीवरुन रुपये १,३०० कोटी करण्याचे प्रस्तावित आहे. २००८-०९ साठी रुपये १२००ककोटी इतका निधी उपलब्ध करून देण्यात येईल. महावितरण व महाजनको या कंपन्यांच्या अनुक्रमे गावठाण फिडर सेपरेशन योजना व विद्युतनिर्मिती प्रकल्प यासाठी भागभांडवलाच्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात येईल.

**माहिती तंत्रज्ञान.** ६४. केंद्र शासनाच्या दुरसंचार विभागाने स्टेट वाईड एरिया नेटवर्क हा प्रकल्प मंजुर केला आहे आणि या प्रकल्पासाठी रुपये २२ कोटी उपलब्ध झाले आहेत. या एमएसवॅन प्रकल्पाअंतर्गत सर्व ३५ जिल्हे मंत्रालयाशी ४ Mbps कनेक्टिव्हीटीने आणि सर्व तालुके संबंधित जिल्हयांशी २ Mbps कनेक्टिव्हीटीने ऑप्टिकल फायबरच्या माध्यमातून जोडण्यात येत आहेत.

**जलदगती न्यायालये.** ६५. जलदगती न्यायालय या योजनेस केंद्र शासनाने पुढील पाच वर्षासाठी मुदतवाढ दिलेली आहे. सध्या राज्यात १६० जलदगती

न्यायालये कार्यरत आहेत. जलदगती न्यायालयांकडे डिसेंबर, २००७ पर्यंत एकूण ३.९३ लक्ष प्रकरणे हस्तांतरित करण्यात आली आहेत. त्यापैकी एप्रिल २००१ ते डिसेंबर २००७ पर्यंत एकूण २.६० लक्ष एवढी प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

६५.१ ही योजना कार्यान्वित करण्याबाबत महाराष्ट्र शासन हे अग्रेसर असून महाराष्ट्र शासनाने ती यशस्वीपणे कार्यान्वित केल्याबद्दल केंद्र शासनाने तसेच सर्वोच्च न्यायालयाने समाधान व्यक्त केले आहे.

**न्यायालये निर्माण करणे.**

६६. न्यायदानाची प्रक्रिया सुलभ होण्याच्या दृष्टीने ज्या तालुक्यामध्ये सध्या न्यायालये अस्तित्वात नाहीत अशा एकूण ५३ तालुक्यांच्या ठिकाणी दिवाणी न्यायालय (कनिष्ठ स्तर) व प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी न्यायालये सुरु करण्यास मान्यता दिली आहे.

६६.१ वसई, जिल्हा ठाणे येथे अतिरिक्त व सत्र न्यायालय व दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) न्यायालय दिनांक ८ ऑगस्ट, २००७ पासून कार्यान्वित करण्यात आले आहे.

६६.२ नगर दिवाणी व सत्र न्यायालय, मुंबई या न्यायालयाची सत्र शाखा गोरेगांव-दिंडोशी येथे सुरु करण्यास मान्यता देवून सदर न्यायालय दिनांक १९ सप्टेंबर, २००७ पासून कार्यान्वित करण्यात आले आहे.

**ग्राहक न्यायालये.**

६७. मुंबई शहरामधील प्रलंबित प्रकरणांची संख्यां लक्षात घेता अतिरिक्त ग्राहक न्यायालयांची स्थापना करण्यात येईल.

**वैद्यकीय शिक्षण.**

६८. राज्यातील वैद्यकीय महाविद्यालये व त्यास संलग्न असणारी हॉस्पीटल्स अद्ययावत करण्यासाठी पुढीलप्रमाणे तरतूद करण्याचे मी ठरविले आहे.

(१) बि.जे. मेडीकल कॉलेज पुणे व ससुन हॉस्पिटल पुणे---रुपये ३३ कोटी

(२) नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय तसेच अति विशेषउपचार रुग्णालय नागपूर—रुपये १६ कोटी.

(३) इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,नागपूर—रुपये २.५८ कोटी आणि बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय, नागपूर — रुपये १.७८ कोटी.

(४) औरंगाबाद वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय—रुपये ४०.८८ कोटी.

(५) सोलापूर येथील वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय—रुपये २२.५४ कोटी.

(६) मिरज येथील वैद्यकीय महाविद्यालय—रुपये १३ कोटी.

(७) मिरज येथील शासकीय रुग्णालय—रुपये १२ कोटी.

(८) सांगली येथील रुग्णालय—रुपये ६० लाख.

(९) नांदेड येथील शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय —रुपये ८.३३ कोटी.

(१०) धुळे येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय —रुपये ४ कोटी ९३ लाख ७६ हजार.

(११) अंबेजोगाई येथील वैद्यकीय महाविद्यालय—रुपये ६ कोटी.

(१२) लातूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय —रुपये ७ कोटी.

(१३) मुंबई येथील जे. जे. रुग्णालय—रुपये ११.२० कोटी.

(१४) शासकीय दंत वैद्यकीय महाविद्यालय औरंगाबाद—रुपये १.६१ कोटी.

(१५) अन्न व औषधी प्रशासन यांच्या औरंगाबाद येथील कार्यालयीन इमारतीकरिता—रुपये २.५० कोटी.

(१६) हाफकीन संस्थेचे बळकटीकरण व श्रेणीवर्धनसाठी—रुपये २ कोटी.

**राज्यातील राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण.**

**६९.** शासनाने कृषी व औद्योगिक आधारित उद्योगांच्या विकासासाठी पायाभूत सुविधा म्हणून भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या सहकार्याने महत्वाच्या रस्त्यांचे चौपदरीकरण करण्याचा महत्वाकांक्षी कार्यक्रम आखला आहे. सद्य:स्थितीत ६५५ किलोमीटर लांबीचे राष्ट्रीय महामार्ग चौपदरी असून ४९७ किलोमिटर चौपदरीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. १,१२७ किलोमिटर लांबीचे चौपदरीकरण करणे प्रस्तावित आहे. यामुळे राज्यातील औरंगाबाद, नाशिक, धुळे, नागपूर आणि अमरावती ही शहरे चौपदरी रस्त्यांनी जोडली जातील.

**६९.१** शासनाने काही महत्वाच्या राज्यमार्गाच्या चौपदरीकरणाचा महत्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला असून रुपये ४,०३७ कोटी इतक्या रकमेचे २६ प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत. यासाठी रुपये ३,१४५ कोटी खाजगी गुंतवणूक अपेक्षित असून सुमारे रुपये ८९२ कोटी इतका शासनाचा आर्थिक सहभाग असेल. यामधून १,६२७ किलोमीटर लांबीचे चौपदरीकरण करण्याचे योजिले आहे.

**६९.२** पुणे-नाशिक रस्त्याच्या चौपदरीकरणास मंजुरी मिळण्यासाठी राज्य शासनाकडून केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. यामुळे पुणे-नाशिक-मुंबई हा सुवर्ण त्रिकोण ४/६ पदरी मार्गाने जोडला जाऊन या औद्योगिक क्षेत्राच्या जलद विकासासाठी त्याचा वापर होईल.

**६९.३** मुंबई शहरातील वाहतुकीची कोंडी दूर करण्यासाठी आणि या शहरास आंतरराष्ट्रीय शहर करण्यासाठी शासनाने अगोदरच वांद्रे-वरळी सागरी मार्ग हा प्रकल्प हाती घेतला आहे आणि याचा विस्तार पुढे नरिमन पॉईंट पर्यंत करण्याचे प्रस्तावित आहे. हा प्रकल्प डिसेंबर, २००९ पर्यंत पूर्ण होईल.

**रस्ते विकासाकरिता अतिरिक्त नियतव्यय.**

**७०.** रस्ते विकासाकरिता सन २००८-०९ या वर्षामध्ये रुपये ७० कोटी इतक्या नितव्यया व्यतिरिक्त रुपये २५० कोटी इतका अतिरिक्त नियतव्यय लोकोपयोगी रस्ते व पूल विषयक कामांसाठी उपलब्ध करुन देण्यात येईल.

**मुंबई शहरातील शासकीय पुरातन वास्तु पूर्ववत करुन जतन करणे.**

७१. मुंबई शहरातील राज्य शासकीय हेरिटेज वास्तु ह्या मुंबईचे सौंदर्य जतन करणाऱ्या, तसेच मुंबईला अभिमानास्पद ठरणाऱ्या अशा आहेत. अशा सर्व राज्य शासकीय वास्तुंचे जतन करण्याच्या दृष्टीने पुरातन वास्तु पूर्ववत करण्याबाबत सर्वंकष कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. या बाबीसाठी सन २००८-०९ या वर्षासाठी रुपये १५ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात येत आहे.

**राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान.**

७२. ग्रामीण जनतेस परवडण्याजोगी विश्वासार्ह आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने संपूर्ण देशात एप्रिल, २००५ पासून राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान सुरु केले आहे.

७२.१ या अभियानातंर्गत राज्यातील १७१ ग्रामीण रुग्णालयांची दर्जावाढ करण्यासाठी निवड करण्यात आली असून, ह्या रुग्णालयांत विविध पूरक सेवा-सुविधा उपलब्ध करण्याकरिता प्रत्येकी रुपये २० लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तसेच, ग्रामीण स्तरावर ७,५४९ आशा या आरोग्य स्वयंसेविकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

७२.२ जानेवारी २००८ पर्यंत या प्रयोजनार्थ रुपये ३१८ कोटी इतका खर्च झाला असून, सदर अभियानासाठी सन २००८-०९ या वर्षाकरिता रुपये १५.९० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**आरोग्य योजनेकरिता अतिरिक्त नियतव्यय.**

७३. आरोग्य विभागाकरिता सन २००८-०९ या वर्षामध्ये रुपये ९९१.५ कोटी इतक्या नियतव्यया व्यतिरिक्त रुपये १६५ कोटी इतका अतिरिक्त नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात येईल. हा निधी राज्याचा हिस्सा म्हणून राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान व मातृत्व अनुदान योजनेच्या विस्तारीकरणासाठी उपयोगात आणला जाईल.

रोजगार हमी योजना.

७४. सन २००७-०८ या वित्तीय वर्षात जानेवारी २००८ अखेर रोजगार हमी योजनेवरील एकूण खर्च अंदाजे रुपये ६१० कोटी इतका असून त्याद्वारे ५ कोटी मनुष्य दिवस रोजगार निर्मिती झाली आहे.

७४.१ राज्यातील १८ जिल्हयांत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना राबविण्यास सुरुवात झाली असून, जानेवारी २००८ अखेर रुपये ११४ कोटी इतका खर्च झाला आहे.

७४.२ दिनांक १ एप्रिल २००८ पासून उर्वरित १५ जिल्ह्यांचा समावेश महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेत करण्यांत येईल. अशाप्रकारे राज्यातील सर्व जिल्ह्यांत ही योजना सुरु होईल.

७४.३ रोजगार हमी योजना निधीत दर आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला किमान रुपये २,००० कोटी इतकी शिल्लक तरतूद असेल याची खातरजमा शासन करेल.

राज्याचे निसर्ग पर्यटना बाबतचे धोरण.

७५. पर्यटकांना वने आणि विशेषत: राष्ट्रीय उद्याने, अभयारण्ये व व्याघ्र प्रकल्प यांचे पूर्वीपासून आकर्षण आहे. परंतु, या आकर्षणाचा उपयोग करुन घेऊन निसर्ग पर्यटनाचा विकास करण्यासाठी कोणतेही भरीव प्रयत्न झाले नाहीत ही बाब विचारात घेऊन निसर्ग पर्यटनास चालना देण्यासाठी राज्याचे निसर्ग पर्यटनाबाबतचे धोरण जाहीर करण्यात आले आहे. जैविक विविधतेस कोणतीही हानी न पोहचविता पर्यटकांना सोयी-सुविधा पुरविणे व या क्षेत्रातील स्थानिक लोकांना रोजगार पुरविणे ही या धोरणाची मुख्य उद्दिष्टे आहेत. या प्रयोजनार्थ सन २००८-०९ या वर्षाकरिता रुपये ५ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

वन विकासा-करिता अतिरिक्त नियतव्यय.

७६. वन विकासासाठी सन २००८-०९ या वर्षामध्ये रुपये ८६.३० कोटी इतक्या नियतव्ययाव्यतिरिक्त रुपये १९ कोटी इतका अतिरिक्त

नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात येईल. यात गोरेवाडा प्राणी संग्रहालयाच्या स्थापनेकरिता रुपये २ कोटी, निसर्ग पर्यटन कार्यक्रमाकरिता रुपये १० कोटी, वन क्षेत्रात मृद व जलसंधारणांची कामे करण्याकरिता रुपये ६ कोटी यांचा समावेश राहील. राज्य शासनाने वन औषधींचे संवर्धन करण्यासाठी औषधी मंडळ स्थापन करण्याचे ठरविले असून या मंडळासाठी सुरुवातीचे भागभांडवल म्हणून रुपये १ कोटी इतका निधी देण्यात येईल.

**राष्ट्रीय चक्रीवादळ निवारण प्रकल्प.**

७७. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या सहाय्याने राज्याच्या किनारपट्टी भागातील ६ जिल्ह्यांमध्ये चक्रीवादळाचा धोका निवारण करण्यासाठी प्रकल्प राबविला जाणार आहे. या प्रकल्पाची रुपये १११ कोटी इतकी सुधारित किंमत असून त्यास केंद्र सरकारची मान्यता अपेक्षित आहे.

**मदत व पुनर्वसनाकरिता अतिरिक्त नियतव्यय.**

७८. मदत व पुनर्वसनासाठी सन २००८-०९ या वर्षामध्ये रुपये १०० कोटी इतक्या नियतव्ययाव्यतिरिक्त रुपये ५० कोटी इतका अतिरिक्त नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात येईल. हा निधी आपत्ती निवारण कामे, जनजागृती, प्रशिक्षण, दळणवळणाच्या सुविधा सुधारणे यासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल.

**स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना.**

७९. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना स्वयंरोजगाराचे साधन उपलब्ध करून देवून त्यांना दारिद्र्य रेषेच्या वर आणणे हा स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचा प्रमुख उद्देश आहे. या योजनेअंतर्गत प्रामुख्याने बचत गट स्थापण्यावर भर देण्यात येतो. योजना सुरु झाल्यापासून योजनेअंतर्गत रुपये ८९१ कोटी एवढा खर्च झाला असून, ३.७४ लक्ष लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे व रुपये १,०९९ कोटी एवढा कर्ज पुरवठा करण्यात आला आहे. या कार्यक्रमातंर्गत ३.०२ लक्ष महिला लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे. या प्रयोजनार्थ सन २००८-०९ या वर्षाकरिता रुपये ७०.१४ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

केंद्रपुरस्कृत प्रधानमंत्री ग्राम सडक योजना.

८०. सन २००७-०८ या वित्तीय वर्षामध्ये केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेखाली लक्षणिय प्रगती झाली असून, यावर्षी १,०७३ किलोमिटर लांबीचे रस्ते बांधण्यांत आले असून, रुपये ३५४ कोटीपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे. टप्पा-५ व ६ अंतर्गत १०,७०९ किलोमिटर लांबीचे रस्ते बांधण्यात येतील. त्यामुळे ४,३६३ गावे व वस्त्या जोडण्यात येतील. या दोन टप्प्यांसाठी रुपये २,५६१ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

ग्रामीण भागातील तिर्थक्षेत्रांचा विकास.

८१. ग्रामीण भागातील तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी दिवसेंदिवस देवदर्शनासाठी भाविक/यात्रेकरुंची संख्या मोठ्या प्रमाणांत सातत्याने वाढत आहे. अशा ठिकाणी भाविक/यात्रेकरु यांना विविध नागरी सोयी-सुविधा देण्याच्या दृष्टीने शासनाने राज्यातील तिर्थक्षेत्रांचा विकास करण्याचे ठरविले आहे. या योजनेंतर्गत ग्रामीण तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी रस्ते, पाणी पुरवठ्याची व्यवस्था करणे, सार्वजनिक स्वच्छतागृहे, वाहनतळ, यात्री निवास, रस्त्यावरील दिवे आणि बाग बगीचे इत्यादी सुविधा निर्माण केल्या जातात.

८१.१ राज्यात एकूण १५७ ठिकाणी तीर्थक्षेत्रांची कामे प्रगतीपथावर आहेत.

८१.२ सन २००७-०८ या आर्थिक वर्षात या योजनेसाठी रुपये २८.५१ कोटी इतका खर्च करण्यात आला आहे. तसेच, सन २००८-०९ या वर्षाकरिता रुपये ६७.६५ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

राष्ट्रीय सम विकास योजना / मागास भागासाठी अनुदान निधी योजना.

८२. केंद्र शासनाने मागास जिल्हयांच्या विकासासाठी विशेष उपक्रम म्हणून राष्ट्रीय समविकास योजना सन २००३-०४ पासून सुरु केली आहे . या योजनेचे नामांतर मागास भागासाठी अनुदान निधी योजना असे केले आहे. सदर योजनेमध्ये राज्यातील गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, नांदेड, हिंगोली, धुळे, नंदुरबार, अहमदनगर, अमरावती, औरंगाबाद व यवतमाळ या जिल्ह्यांचा समावेश आहे.

या योजनेतंर्गत जानेवारी, २००८ अखेर रुपये ४४२.६३ कोटी इतका खर्च झाला आहे. या प्रयोजनार्थ सन २००८-०९ या वर्षाकरिता रुपये ३६२ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**इंदिरा आवास योजना.** ८३. इंदिरा आवास योजनेतंर्गत ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील अनुसूचित जाती /अनुसूचित जमातीचे सदस्य, मुक्त वेठबिगार आणि बिगर अनुसूचित जाती / जमातीच्या गरीब व्यक्ती यांच्यासाठी घरकुले बांधून दिली जातात. सन २००७-०८ या वर्षामध्ये आतापर्यंत ४८,७७५ घरकुले पूर्ण झाली असून ९९,३९४ घरकुलांचे काम प्रगतीपथावर आहे. या योजनेवर डिसेंबर २००७ अखेर रुपये १८४.५० कोटी खर्च झाला आहे. या प्रयोजनार्थ सन २००८-०९ या वर्षाकरिता रुपये ११६.१६ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**यशवंत ग्रामसमृध्दी योजना.** ८४. सन २००७-०८ मध्ये यशवंत ग्रामसमृद्धी योजनेतंर्गत ६१.१३ कोटी एवढ्या निधीचे वितरण करण्यात आले आहे. सन २००८-०९ या वित्तीय वर्षात या योजनेसाठी रुपये २१२.७९ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. यामुळे योजनेतंर्गत प्रस्तावित असलेली सर्व कामे पूर्ण होण्यास मदत होईल.

**ग्राम विकास भवन.** ८५. पंचायतराज पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षणासाठी खारघर, नवी मुंबई ग्रामविकास भवनाचे बांधकाम करण्यात येत आहे. या प्रकल्पामध्ये बचतगटासाठी ३४ गाळे, प्रशिक्षणासाठी ६३० व्यक्तींसाठीचे सभागृह, कार्यशाळा सभागृह, तसेच निवासी सोयीकरीता ६४ खोल्या इत्यादींची तरतूद करण्यात आलेली आहे. त्याचबरोबर पंचायतराज महिला पदाधिकारी, अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी ४० खोल्याचे वसतीगृह बांधण्याचे विचाराधीन असून, त्यासाठी प्रथम टप्प्याकरिता अंदाजे रुपये १७ कोटी इतका खर्च येणार आहे. त्याकरिता रुपये १२ कोटीची तरतूद करण्यात येईल.

मानव विकास मिशन.

८६. मानव विकास मिशन राज्यातील १२ जिल्ह्यात चालू असून त्याची प्रगती समाधानकारक आहे. त्यामुळे त्या जिल्ह्यातील काही तालुक्यांच्या निर्देशांक सुधारण्यास मदत होत आहे. सन २००८-०९ साठी रुपये ६५ कोटी मानव विकास मिशन साठी नियतव्यय प्रस्तावित आहे. त्यामुळे मानव विकास निर्देशांकात अधिक सुधारणा होईल असा मला विश्वास आहे.

गतिमान पाणलोट विकास कार्यक्रम.

८७. राज्यात ९३ लक्ष हेक्टर क्षेत्रात पाणलोट विकासाची कामे हाती घेण्यात आली आहेत. या कार्यक्रमांतर्गत ३२,००० पाणलोट सुरु करण्यात आले असून त्यापैकी ९,००० पाणलोट पूर्ण झाले आहेत. अपूर्ण पाणलोटांची कामे जलद गतीने पूर्ण करण्याच्या उद्देशाने राज्यातील ३५३ तालुक्यात गतिमान पाणलोट विकासाचा धडक कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या कार्यक्रमांतर्गत सन २००७-०८ या वर्षात रुपये १०० कोटी इतका खर्च अपेक्षित असून सन २००८-०९ या वर्षाकरिता जिल्हा योजनेत रुपये १२२ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

राष्ट्रीय कृषी विकास योजना.

८८. राष्ट्रीय विकास परिषदेने निश्चित केलेला ४ टक्के कृषी विकासाचा दर गाठण्यासाठी केंद्र शासनाच्या कृषी मंत्रालयाने राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत पुढील कार्यक्रम / योजना जाहीर केल्या आहेत.

(अ) शेततळी बांधण्याचा कार्यक्रम या योजनेंतर्गत राज्यातील कापसाचे पीक घेणाऱ्या विदर्भ व मराठवाडा विभागातील १६ जिल्हयांमध्ये जलसंधारण कार्यक्रमांतर्गत सन २००७-०८ मध्ये १७,५०० शेततळी बांधण्यात येणार आहेत. या कार्यक्रमासाठी केंद्र शासनाकडून रुपये ८० कोटी निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच, हा कार्यक्रम येत्या खरिप हंगामापूर्वी पूर्ण करावयाचा असल्यामुळे तो धडक मोहिमेच्या स्वरुपात राबविण्यात येणार आहे.

(ब) माजी मालगुजारी तलावांची दुरुस्ती या कार्यक्रमांतर्गत सन २००७-०८ या वर्षात विदर्भातील गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया

व भंडारा जिल्ह्यातील माजी मालगुजारी तलावांची दुरुस्ती करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी केंद्र शासनाने रुपये २० कोटी मंजूर केले असून, त्याद्वारे ६८५ माजी मालगुजारी तलावांची दुरुस्ती करण्यात येणार असून त्याद्वारे ३,८७५ हेक्टर सिंचन क्षमता पुनर्स्थापित होणार आहे.

**सच्छिद्र पाईपद्वारे क्षारपड जमिन सुधारणा प्रकल्प राबविणे बाबत.**

८९. राज्यातील पुणे, सांगली व अहमदनगर या तीन जिल्ह्यांमध्ये उपग्रहाद्वारे करण्यात आलेल्या सर्वेक्षणामध्ये २.४० लक्ष हेक्टर जमीन क्षारपड बाधीत झाल्याचे दिसून आले आहे. केंद्र शासनाने राष्ट्रीय पडीक जमीन विकास योजनेअंतर्गत या क्षारपड जमीन सुधारण्याचे दोन पथदर्शी प्रकल्प मंजूर केले आहेत. त्यामध्ये क्षारपड जमिनीचा विकास सच्छिद्र पाईप वापरुन बंदिस्त निचरा प्रणालीद्वारे केला जातो. क्षारपड जमीन सुधारणा प्रकल्पास शेतकऱ्यांकडून खूप मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे हे लक्षात घेता २००८-०९ या वर्षामध्ये रुपये २० कोटी इतका निधी राज्य शासनाकडून उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे.

**आम आदमी विमा योजना.**

९०. शासनाने दिनांक १६ ऑक्टोबर, २००७ पासून केंद्र शासनाची आम आदमी विमा योजना राबविण्याचा निर्णय घेतला असून या योजनेअंतर्गत भूमिहीन कुटूंबातील १८ ते ५९ वर्षे वयोगटातील मिळवता कुटूंबप्रमुख किंवा त्या कुटुंबातील एक मिळवती व्यक्ती लाभार्थी असतील. लाभार्थीचा मुदतीपूर्वी मृत्यू झाल्यास वारसास भारतीय आयुर्विमा महामंडळाकडून रुपये ३०,००० इतकी आश्वासित रक्कम मिळेल. लाभार्थीचा अपघाती मृत्यू झाल्यास रुपये ७५,००० एवढी रक्कम मिळेल.

**विशेष घटक योजना.**

९१. अनुसूचित जातीच्या कल्याणाच्या व विकासाच्या योजनांकरिता आवश्यक तो निधी उपलब्ध होईल याकडे मी लक्ष पुरवेन. विशेष घटक योजनेतंर्गत सन २००८-०९ या वर्षाकरिता एकूण रुपये २,३३२.७९ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**तांडा वस्ती विकास योजना.** ९२. दलित वस्ती सुधार योजनेच्या धर्तीवर तांडा वस्ती सुधार योजना दिनांक १ जून २००५ पासून राबविण्यात येत आहे. सन २००७-०८ मध्ये रुपये २३.७७ कोटी इतकी तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली असून सन २००८-०९ या वर्षाकरिता या योजनेकरिता रुपये २५.५३ कोटीची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**संजय गांधी निराधार योजना.** ९३. संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत १८ ते ६५ वर्षे वयोगटातील निराधार स्त्री - पुरुष यांना दरमहा रुपये २५० इतके अर्थसहाय्य देण्यात येते. सन २००७-०८ मध्ये रुपये ११२.९५ कोटी इतकी तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली असून सन २००८-०९ या वर्षाकरिता या योजनेकरिता रुपये ११२.९५ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**महामंडळांना भागभांडवल.** ९४. सामाजिक न्याय विभागांतर्गत कार्यरत महामंडळांच्या विविध योजना राबविण्याकरिता सन २००८-०९ या वर्षात भागभांडवल उपलब्ध करुन देण्यात येईल. यात संत रोहिदास चर्मोद्योग विकास महामंडळाकरिता रुपये ३० कोटी, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळास रुपये ६० कोटी, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाकरिता रुपये १६ कोटी, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळासाठी रुपये १०० कोटी अशी भरीव तरतूद उपलब्ध करून देण्यात येतील या व्यतिरिक्त महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ, शेळी व मेंढी विकास महामंडळास भरीव तरतूद उलपब्ध करून देण्यात येईल.

**सर्वशिक्षा अभियान.** ९५. सर्वशिक्षा अभियानातंर्गत डिसेंबर, २००७ पर्यंत ४०,२१२ वर्गखोल्या, २६३ गटसाधन केंद्रे व ३,३२८ समूह साधन केंद्रे बांधण्यात आली. राज्यातील ३.१८ लक्ष विद्यार्थ्यांना अपंग समावेशित कार्यक्रमात साधने, शस्त्रक्रिया व इतर सहाय्यभूत सुविधा पुरविण्यात आल्या

आहेत. सन २००७-०८ या वर्षात राज्य शासनाने व केंद्र शासनाने अनुक्रमे रुपये २७७.०९ कोटी व रुपये ५५७.३० कोटी इतका निधी उपलब्ध करुन दिला आहे.

**९५.१** सन २००८-०९ मध्ये राज्य हिश्श्यापोटी रुपये ४०२.५० कोटी नियतव्यय प्रस्तावित केला आहे.

**आदिवासी विद्यार्थ्यांना सैनिकी शाळांचे शिक्षण.**

**९६.** आदिवासी विद्यार्थ्यांना सैनिकी शाळेचे शिक्षण देण्यासाठी राज्यात सुरु असलेल्या सैनिकी शाळांना जोडून जादा ३३ तुकडया सुरु करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

**९६.१** सदर योजनेमुळे प्रतिवर्षी १,४८५ आदिवासी विद्यार्थ्यांना सैनिकी शाळेत प्रवेश मिळेल.

**शालेय पोषण आहार.**

**९७.** शालेय पोषण आहार योजना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यामध्ये राबविण्यात येत आहे. जवळपास ८० लक्ष विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळत आहे. दिनांक १ जानेवारी, २००८ पासून सदर योजनेची व्याप्ती वाढवून उच्च प्राथमिक, इयत्ता ६ वी ते ८ वी चे विद्यार्थी सदर योजनेत समाविष्ट करण्यात आले आहे. प्रायोगिक तत्वावर शैक्षणिकदृष्टया मागास असलेल्या ४३ तालुक्यात ही योजना राबविण्यात येत आहे. या प्रयोजनार्थ सन २००८-०९ या वर्षाकरिता रुपये ३४२.०८ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली असून याचा लाभ ८४ लक्ष विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

**विद्यार्थीनींना सायकल पुरविणे.**

**९८.** सर्व शिक्षा अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे ग्रामीण भागातील मुलींचे गळतीचे प्रमाण सन २००२-०३ मध्ये २६ टक्के होते ते सन २००६-०७ मध्ये २०.८४ इतके खाली आले आहे. गळतीच्या या प्रमाणात भरीव सुधारणा होण्याच्या दृष्टिने ग्रामीण भागातील ८व्या इयत्तेत शिक्षण घेणाऱ्या दारिद्र्यरेषेखालील विद्यार्थीनींना मोफत

सायकली पुरविण्यात येतील. यासाठी रुपये २० कोटींची तरतूद करण्यात येईल.

क्रीडा.

९९. राज्यामध्ये पुणे येथे दिनांक १२ ते १८ ऑक्टोबर २००८ दरम्यान तिसरी राष्ट्रकूल युवा क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात येणार असून त्यामध्ये ७१ देश सहभागी होणार आहेत, ही महाराष्ट्रासाठी एक अभिमानाची बाब आहे. या स्पर्धांकरिता श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा सोई-सुविधा निर्मीती व विस्तारीकरण होणार आहे. आतापर्यंत राज्य हिश्यापोटी रुपये १०० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून सन २००८-०९ करिता रुपये ५० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

राज्यातील जिल्हा व विभागीय क्रीडा संकुलांचे बांधकाम.

१००. सन २००३ पासुन राज्यात तालुका, जिल्हा व विभागीय क्रीडा संकुलाचे बांधकाम करण्याची योजना राबविण्यात येत आहे. त्यामध्ये आतापर्यंत १६ तालुका क्रीडा संकुले व ३ जिल्हा क्रीडा संकुलांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. उर्वरित संकुलांचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी सन २००८-०९ या वर्षामध्ये रुपये १३.११ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती या संस्थेस निधी.

१०१. शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती या नामांकित शिक्षण संस्थेस ७५ वर्षे पूर्ण झाली असून, त्यांच्या विविध विकास कामांसाठी सन २००८-०९ या वर्षात रुपये ७५ लक्ष इतका निधी शासन उपलब्ध करुन देईल.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जन्मगांव चौंडी, येथील स्मारकाचा विकास.

१०२. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जन्मगांव असणाऱ्या अहमदनगर जिल्ह्यातील चौंडी येथील स्मारकाचे जतन आणि विकास करण्यासाठी यावर्षी रुपये २ कोटींची विशेष तरतूद करण्यात येईल.

**देहू आळंदी परिसराचा विकास.**

**१०३.** पंढरीची विठ्ठल रुखमाई आणि त्यांच्या भक्तीमध्ये तल्लीन झालेला तुका हे अवघ्या महाराष्ट्राचे भावविश्व आहे. आषाढी कार्तिकीला निघणाऱ्या पालख्या आणि ग्यानबा तुकाराम यांचा गजर ही ४०० वर्षाची समृद्ध परंपरा आणि त्याचे तेवढ्याच निष्ठेने पालन करणारे वारकरी हे महाराष्ट्राचे सांस्कृतिक आणि अध्यात्मिक वैभव आहे. श्री तुकाराम महाराज यांच्या जन्मास फेब्रुवारी २००९ मध्ये ४०० वर्षे पूर्ण होत आहे. या निमित्ताने देहू, आळंदी, भंडारा-डोंगर आणि पंढरपूर या परिसराच्या विकासासाठी महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेण्यात येणार आहे. त्यामध्ये येणाऱ्या भक्तांसाठी सोयी सवलती उपलब्ध करून देणे, पालखी मार्गाची सुधारणा या कामांचा समावेश आहे.

**अष्टविनायक मंदिरासाठी मुलभूत सोईसुविधा.**

**१०४.** अष्टविनायक मंदिरे राज्यातील महत्त्वाची तिर्थक्षेत्र व पर्यटन स्थळ असून राज्यातून व देशभरातून लाखो भाविक या तिर्थक्षेत्रांना दरवर्षी भेट देत असतात. या भाविकांना पिण्याचे पाणी, निवास, स्वच्छतागृह इत्यादी मुलभूत सुविधांची आवश्यकता आहे. या सर्व तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी मुलभूत सोईसुविधा देण्यासाठी या अर्थसंकल्पीय रूपये १० कोटींची तरतूद करण्यात येत आहे.

**सांस्कृतिक कार्य विभागाच्या योजना.**

**१०५.** सांस्कृतिक कार्य विभागाकरिता सन २००८-०९ या वर्षाकरिता रुपये २५ कोटी इतका अतिरिक्त नियतव्यय उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यात ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाच्या राज्य संरक्षित स्मारकाचे जतन व दुरूस्ती व १३ शासकीय वस्तुसंग्रहालये यांच्या देखभाल व विकासासाठी अनुक्रमे रुपये ४.७० कोटी व रुपये १.५५ कोटी, लोककलावंतासाठी असलेल्या अनुदान पॅकेज करिता रुपये २.७५ कोटी, पु.ल. देशपांडे कला अकादमीच्या उर्वरित कामासाठी रुपये २ कोटी, साहित्य संस्कृती व विश्वकोश निर्मिती मंडळ यांच्या योजनांसाठी अनुक्रमे रुपये १५ लक्ष व २५ लक्ष व

प्रत्येक जिल्ह्यातील २ तालुक्यांच्या ठिकाणी ॲम्फी थिएटर बांधण्यासाठी एकूण १६ कोटी यांचा अंतर्भाव आहे.

**राष्ट्रसंत श्री.तुकडोजी महाराज जन्मशताब्दी वर्ष.**

**१०६.** राष्ट्रसंत श्री.तुकडोजी महाराज यांच्या जन्मतिथीस एप्रिल २००९ मध्ये १०० वर्षे पूर्ण होत असल्यामुळे सन २००८-०९ हे वर्ष शासनाने राष्ट्रसंतांचे जन्मशताब्दी वर्ष म्हणून साजरे करण्याचे योजिले आहे.

**पर्यटन व सांस्कृतिक कार्याकरिता अतिरिक्त नियतव्यय.**

**१०७.** पर्यटन विकास व सांस्कृतिक कार्याकरिता सन २००८-०९ या वर्षामध्ये अनुक्रमे रुपये २२ कोटी व रुपये २५ कोटी इतका अतिरिक्त नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात येईल.

**अँग्रीया बँक**

**१०८.** महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या शोधमोहिमेच्या पहिल्या टप्प्यात विजयदुर्ग, रत्नागिरी आणि मालवणच्या पश्चिमेस सुमारे १२० कि.मी. अंतरावर समुद्रांतर्गत अंदाजे २० मीटर खोलीवर अँग्रीया बँक हा टापू आढळून आला आहे. किनारपट्टीपासूनचे याचे अंतर आणि अन्य सागरी विशेषांचा विचार करता या टापूतील पाणी स्फटीकासारखे स्वच्छ असेल अशी अपेक्षा आहे आणि विस्तृत प्रवाळ समूह व समृद्ध मत्स्यजीवनामुळे देशातील डायव्हींगच्या ठिकाणांत हे सर्वोत्कृष्ट ठरू शकेल. शास्त्रीय अभ्यासानुसार या प्रवाळ समूहाची लांबी ३९ कि.मी., रुंदी २० कि.मी. व खोली सरासरी २० मीटर आहे. पुढील शोधमोहिमेअंती चांगले परिणाम मिळाल्यास महाराष्ट्राच्या या समुद्रकिनारी भारतातील सर्वात मोठा प्रवाळ समूह असण्याची शक्यता आहे व याचा किनारी व समुद्र पर्यटनावर चांगला प्रभाव पडेल. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पर्यटकांसाठी, डायव्हींगसाठी हे नवीन आकर्षणाचे ठिकाण ठरू शकेल. अँग्रीया बँकच्या संशोधनासाठी महाराष्ट्र शासनाने पुढाकार घेण्याचे ठरवले असून जैविक वैविध्याच्या अभ्यासानंतर पर्यटनस्थळ म्हणून या प्रकल्पाची व्यवहार्यता तपासण्यात येईल. या प्रवाळ बेटामुळे महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या

पर्यटनाविषयक कल्पना बदलण्याची शक्यता आहे. या प्रकल्पाच्या व्यवहार्यतेच्या अभ्यासानंतर राज्य शासन अँग्रीया बँकचे क्षेत्र व्यवस्थापनासाठी व पर्यटनस्थळ म्हणून विकसित करण्यासाठी भारत सरकारला सविस्तर प्रस्ताव सादर करेल. यासाठी रुपये ५ कोटी उपलब्ध करून देण्याचे मी प्रस्तावित करत आहे.

**ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा कार्यक्रमाचे विस्तारीकरण.**

**१०९.** ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा कार्यक्रम आता आदिवासी उपयोजना क्षेत्र, अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्र, माडा/मिनीमाडा क्षेत्र व आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील क्षेत्रातील गांवांमध्येही विस्तारीत करण्यात आली आहे. या योजनेसाठी सन २००७-०८ मध्ये रुपये ६० कोटी इतका खर्च झाला असून, सन २००८-०९ या वर्षाकरिता या प्रयोजनार्थ रुपये ९०.३८ कोटी इतकी तरतूद आदिवासी उपयोजनेखाली प्रस्तावित करण्यात आली आहे.

**आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहे.**

**११०.** आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करुन देण्याचा एक भाग म्हणून सध्या राज्यात ३४३ वसतीगृहे सुरु करण्यात आलेली आहेत. त्यामध्ये २२,७३३ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आलेला आहे. आणखी नवीन १४० वसतीगृहे सन २००८-०९ पासून टप्प्याटप्प्याने सुरु करण्यात येत आहेत. त्यामुळे आणखी ३६,००० विद्यार्थ्यांची राहण्याची व शिक्षणाची सोय होणार आहे.

**आदिवासी क्षेत्राकरिता नियतव्यय.**

**१११.** सन २००८-०९ या वर्षामध्ये आदिवासी उपयोजनेसाठी एकूण रुपये १,९४१.५० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे. आदिवासी कल्याणाच्या योजनांची अंमलबजावणी करण्याकरिता लोकसंख्येच्या प्रमाणात आवश्यक तो निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

**जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान.**

**११२.** नागरी भागातील पायाभूत सुविधांच्या विकासाकरिता केंद्र शासनाने डिसेंबर, २००५ पासून जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान सुरु केले आहे. सदर अभियानांतर्गत केंद्र शासनाने आतापर्यंत महाराष्ट्राचे एकूण रुपये ७,५२८ कोटींचे ५१ प्रकल्प मंजूर

केले आहेत. त्यापैकी केंद्र शासनाच्या हिश्श्याचा पहिला हप्ता म्हणून रुपये ७५० कोटी केंद्र शासनाने वितरीत केलेले आहेत. संपूर्ण देशात या अभियानाखाली वितरीत केलेल्या अनुदानाच्या जवळपास १/३ रक्कम महाराष्ट्र राज्यास मिळालेली असून सदर योजनेच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र राज्य संपूर्ण देशात आघाडीवर आहे.

**११२.१** याच अभियानांतर्गत असलेल्या लहान व मध्यम शहरांच्या पायाभूत सुविधांचा विकास कार्यक्रमामध्ये देखील राज्याने आतापर्यंत ६१ शहरांचे ८१ प्रकल्प अहवाल मंजूर करुन केंद्र शासनाकडे पाठविले आहेत. यापैकी २५ प्रकल्पांना केंद्र शासनाने रुपये १९० कोटी एवढा निधी वितरीत केलेला आहे. या योजनेमधील प्रकल्पांमुळे नागरी भागातील पायाभूत सुविधांच्या विकासाची गती वाढण्यास मदत होत आहे.

**बृहन्मुंबई पर्जन्य जलवाहिन्या प्रकल्प.**

**११३.** केंद्र शासनाने रुपये १२०० कोटीचा बृहन्मुंबई पर्जन्य जलवाहिन्या प्रकल्प मंजूर केला असून यापैकी रुपये ४०० कोटी या वर्षी वितरित करण्यात आलेले आहेत. या प्रयोजनार्थ सन २००८-०९ या वर्षाकरिता रुपये १०० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**मुंबई नागरी परिवहन प्रकल्प.**

**११४.** मुंबई महानगर प्रदेशातील परिवहन व्यवस्थेत सुधारणा करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासन, भारतीय रेल्वे व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मुंबई नागरी परिवहन प्रकल्प सन २००२ पासून हाती घेतला आहे. या प्रकल्पांतर्गत रेल्वे घटक, रस्ते घटक आणि प्रकल्पबाधीत कुटुंबाचे पुनर्वसन यांचा समावेश आहे. या प्रकल्पांतर्गत आतापर्यंत सुमारे १७,१५० प्रकल्पबाधित कुटुंबांचे पुनर्वसन करण्यात आले आहे.

**मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प.**

**११५.** मुंबई नागरी परिवहन प्रकल्पास पूरक म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प हाती घेतला असून त्या अंतर्गत मुंबई शहर, तसेच पूर्व व

पश्चिम उपनगरांतील उन्नत रस्ते, उड्डाणपूल, रेल्वेवर पूल, वाहन भूयारी मार्ग, पादचारी भुयारी मार्ग, मरीन ड्राईव्हचे पुर्न-नुतनीकरण इत्यादी कामे हाती घेण्यात आली आहेत. लोकप्रतिनिधींनी मागणी केल्यानुसार या प्रकल्पाचा विस्तार ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली आणि मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात तसेच पनवेल, वसई, विरार, नगरपालिका क्षेत्रात करण्याचा निर्णय मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने घेतला आहे.

**उन्नत पादचारी मार्ग.**

११६, मुंबईतील उपनगरीय रेल्वे स्थानके आणि इतर गर्दीच्या ठिकाणी पादचाऱ्यांना पायाभूत नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्याकरिता सुमारे १०० किलोमिटर उन्नत पादचारीमार्ग बांधण्यात येत आहेत. बांद्रा स्टेशन ते कलानगर येथील उन्नत पादचारी मार्गाचे काम सुरु असून, कांजूरमार्ग स्टेशन ते जोगेश्वरी-विक्रोळी लिंकरोड व विरार स्टेशन परिसर येथील उन्नत पादचारी मार्गाचे काम प्रस्तावित आहे.

**मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प.**

११७. मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर या मार्गाच्या बांधकामास सुरुवात झाली आहे. तसेच, चारकोप-वांद्रे-मानखुर्द या मार्गाच्या बांधकामासाठी निविदा मागविण्यात आलेल्या आहेत.

**अतिजलद गती रेल्वे.**

११८. महाराष्ट्राच्या मागास भागात गुंतवणुक आकर्षित करुन घेण्यासाठी व विकासाला गती देण्यासाठी अतिजलद गतीची रेल्वे सेवा होणे मला आवश्यक वाटते. त्यासाठी मुंबई ते नागपूर मराठवाडा मार्गे अतिजलद गती रेल्वेची व्यवहार्यता तपासणी करण्याचे शासनाने ठरविले आहे. त्यासाठी स्वतंत्र सल्लागार नेमले असून ते मुंबई क्षेत्रातील अतिजलद रेल्वेच्या व्यवहार्यतेचाही अभ्यास करतील.

**"ड" वर्ग महापालिकांची जकात.**

११९. जकातीमुळे खुल्या व्यापारास अडचणी निर्माण होतात याची शासनास पूर्ण जाणीव आहे. जकातीच्या नाक्यांवर होणाऱ्या विलंबामुळे वेळेचा अपव्यय, नाशवंत मालाचे नुकसान, इंधनाचा अपव्यय यामुळे एकूणच आर्थिक व्यवहार पूर्ण होण्यास विलंब होत असतो/ आर्थिक विकासावर विपरीत परिणाम होतो. याबाबत सांगोपांग विचार

करुन मी राज्यातील, १५ ड-वर्ग महानगरपालिकांमध्ये सन २००८-०९ पासून जकातीऐवजी, नवी मुंबई महानगरपालिकेत यशस्वीपणे राबविली जात असलेली लेखाधारित प्रवेश उपकर पद्धती, सुरू करण्याचे ठरविले आहे.

**११९.१** यासाठी कर्मचाऱ्यांना आवश्यक ते प्रशिक्षण, व्यापाऱ्यांचे नोंदणीकरण आणि आवश्यक असणारी कागदपत्रे तयार करण्याचे काम तातडीने हाती घेण्यात येईल आणि राज्यातील १५ ड-वर्ग महानगरपालिकांमध्ये पहिल्या टप्प्यात जकातीऐवजी लेखाधारित प्रवेश उपकर पद्धती लागू करण्याचा समयबद्ध कार्यक्रम राबविला जाईल.

**मुंबई उपनगरातील चटई क्षेत्रात वाढ.**

**१२०.** मुंबईच्या उपनगरामध्ये सध्या असलेल्या एक चटई क्षेत्र निर्देशांकाची मर्यादा मुंबई शहराप्रमाणे १.३३ इतकी करण्यात येईल. त्यामुळे अनुज्ञेय एक निर्देशांकावरील ०.३३ साठी शीघ्रगणकानुसार चालू बाजार भावाप्रमाणे अधिमुल्याची रक्कम भरावी लागेल.

**मुंबईचा विकास.**

**१२१.** मागील तीन वर्षापासून आम्ही मुंबई शहरावर लक्ष केंद्रीत केले आहे. सर्व प्रमुख प्रकल्पांची कामे सुरु झाली आहेत. सुरवातीच्या अडचणी नंतर वर्सोवा - अंधेरी - घाटकोपर मेट्रो रेल्वे छत्र मार्ग जून २०१० पर्यंत पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे. उर्वरीत छत्र मार्गाची कामे पुढील आठ वर्षात वेगाने पूर्ण करण्याचे निश्चित केले आहे.

**१२१.१** त्याचप्रमाणे, उपनगरीय रेल्वे प्रवाशांना ज्या अडचणींना तोंड द्यावे लागते त्या कमी करण्याच्या दृष्टीने स्वत:हून काही उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत. नवीन रेल्वे लोकल गाड्या येण्यास सुरुवात झाली आहे. पुढील १८ महिन्यांत नवीन १५६ लोकल गाड्या मध्य, पश्चिम आणि हार्बर मार्गावर धावतील अशी अपेक्षा आहे. यामुळे गर्दीच्या वेळी होणारा खोळंबा कमी होऊन बोरीवली आणि ठाणे यापुढे राहणाऱ्या प्रवाशांना प्रवास करणे सुसह्य होईल. आम्ही केलेल्या कसोशीच्या प्रयत्नांमुळे रुपये ४,५०० कोटीच्या मुंबई

नागरी परिवहन प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याला मान्यता मिळाली असून त्याकरिता चालू वर्षाच्या रेल्वे अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे. आम्ही या प्रकल्पासाठी रुपये १,१५० कोटीचा निधी उपलब्ध करुन देण्याचे कबूल केले आहे. मी अशी ग्वाही देतो की, ज्यावेळी सन २०१२ पर्यंत हा टप्पा पूर्ण होईल त्यावेळी रेल्वे प्रवास करणे सुखकारक होईल.

**१२१.२** सार्वजनिक परिवहनास प्रोत्साहन देण्याच्या धोरणानुसार मोनो रेल प्रकल्पाद्वारे तीनही छत्रमार्गांची जोडणी करण्यामध्ये सुधारणा करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे जागतिक दर्जाच्या रेल्वे सेवा व बस सेवा निर्माण होऊन मुख्य मार्गावर अधिक क्षमतेच्या बस सेवा सुरुवात झाल्याने खाजगी वाहनाच्या मागणीमध्ये घट होईल असा मला विश्वास वाटतो. खाजगी वाहनाचा वापर कमी करण्याच्या दृष्टीने ज्या ठिकाणी पुरेशी सार्वजनिक परिवहन सेवा उपलब्ध करुन दिली आहे त्या ठिकाणी प्रत्यक्ष उपाययोजना म्हणून वाहतूक कोंडीसाठी अधिभार सुरु करण्याचा आमचा विचार आहे.

**१२१.३** विविध परिवहन सेवामध्ये समन्वय राखणे ही शहराला भेडसावत असलेली मोठी समस्या आहे. एकसंधी प्रवास आणि उत्कृष्ठ परिवहन पायाभूत सुविधा देण्याकरिता एकत्रित महानगर परिवहन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे.

**१२१.४** मुंबईतील तारापोरवाला मत्स्यालय हे विशेषतः लहान मुलांसाठी आकर्षणाचे केंद्र आहे. पुरेशा गुंतवणुकी अभावी नवीन सुविधा उपलब्ध होऊ न शकल्यामुळे सदर केंद्रास भेट देणाऱ्यांची संख्या कमी झाली आहे. आम्ही मत्स्यालयाच्या आधुनुकीकरणाचे काम हाती घेतले असून, प्रत्यक्ष काम आठ महिन्यांत सुरु होईल अशी अपेक्षा आहे.

१२१.५ मी माझ्या गतवर्षाच्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये संपूर्ण मुंबई महानगर क्षेत्राकरिता पायाभूत सुविधा योजनांबाबत नमूद केले होते. या संदर्भात सर्व लोकप्रतिनिधींशी विचारविनिमय करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. या योजनेतील प्रत्येक प्रकल्प विशिष्ठ संस्थेस देण्याचे ठरविले असून त्याची अंमलबजावणी विहीत मुदतीत पूर्ण करण्यात येईल.

**विमान वाहतुक.** १२२. हवाई वाहतुकीमध्ये अलिकडील काही वर्षात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. सध्या मुंबई, पुणे, औरंगाबाद, नागपूर आणि कोल्हापूर दरम्यान नियमित उड्डाणे सुरु आहेत. राज्याचे आकारमान पाहता नागरी वाहतूक हाताळण्याकरिता आम्ही अधिक विमानतळाचा समावेश करण्याचे योजिले आहे. सन २००८-०९ या वर्षात शिर्डी, सोलापूर, अमरावती, जळगांव, नांदेड आणि लातूर येथील विमानतळांचा विकास करण्यात येईल. नागपूर विमानतळ येत्या काही आठवड्यात महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी आणि भारतीय विमानतळ प्राधिकरण यांच्या संयुक्त उपक्रमाकडे हस्तांतरीत करण्याचे अपेक्षित आहे. नवीन आधूनिक विमानतळ १,२०० हेक्टर क्षेत्रापर्यंत विस्तारीत करण्यात येईल. ह्यामुळे तसेच नागपूरचा विशेष आर्थिकक्षेत्रामध्ये समावेश केल्यामुळे ते देशातील प्रवाशी तसेच मालवाहतुकीचे मध्यवर्ती केंद्र बनेल. त्यामुळे या क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. पुणे आणि नांदेड विमानतळांना देखील मोठ्या प्रमाणात अडचणींना तोंड द्यावे लागत आहेत. नांदेड येथील विमानतळाच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करुन मोठ्या विमानतळ उभारणीसाठी पर्यायी जागा शोधण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत. पुणे शहराजवळ आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी जागा विकसित करण्याचे निश्चित केले आहे.

**मोठे, मध्यम व लघु पाटबंधारे प्रकल्प.**

**१२३.** पाटबंधारे प्रकल्पांसाठी सन २००७-०८ साठी रुपये ५,४१० कोटी अशी भरीव तरतूद शासनाने केली असून त्या द्वारे २ लक्ष हेक्टर सिंचन क्षमता निर्मिती होणार आहे. सन २००८-०९ मध्ये रुपये ५,५०७ कोटी इतक्या नियतव्ययातून सुमारे १.५ लक्ष हेक्टर अतिरिक्त सिंचन क्षमता निर्माण करण्याचे प्रस्तावित आहे. पाणीसाठा निर्मितीवर भर देण्यात येणार असून, सुमारे ६१ अब्ज घनफूट पाणीसाठा निर्माण करण्यात येईल.

**१२३.१** वेगवर्धीत सिंचन लाभ कार्यक्रमातंर्गत सन २००७-०८ मध्ये रुपये १,१०० कोटीपर्यंत केंद्रिय सहाय्य अपेक्षित असून आतापर्यंत रुपये ५४२.९० कोटी इतके अर्थसहाय्य प्राप्त झाले आहे.

**१२३.२** पंतप्रधान पॅकेजअंतर्गत मागील वर्षी रुपये ५९२ कोटी खर्च झाला असून ४५,८६० हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. पंतप्रधान पॅकेज तीन वर्षात पूर्ण करुन विदर्भात १.५९ लक्ष हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्यात येईल.

**सिंचन क्षेत्रात खर्चाचे व्यवस्थापन.**

**१२४.** मागील अर्थसंकल्पात, मी उपलब्ध निधीमध्ये अधिकाधिक सिंचन क्षमता निर्माण करण्याच्यादृष्टीने सिंचन क्षेत्रातील खर्चाच्या व्यवस्थापनाच्या दृष्टीने धोरण नमूद केले होते. जलसंपदा विभागाने सिंचन प्रकल्पांच्या कामानुसार त्यांच्या नियतव्ययाच्या तरतुदी केल्या आहेत. आंतरराज्यीय लवादाच्या निर्णयानुसार, आगामी वर्षात कृष्णा खोरे विकास महामंडळाचा नियतव्यय केवळ साठवणूक क्षमता निर्माण करण्यासाठी वापरण्याचे ठरविले आहे.

**जलविद्युत प्रकल्प.**

**१२५.** २५० मेगॅवॅट क्षमतेच्या घाटघर उद्‌चंन जलविद्युत प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात असून या प्रकल्पापासून वीजेच्या कमाल मागणी काळात या वीजनिर्मितीचा फायदा सन २००८-०९ पासून होणार आहे. सरदार सरोवर आंतरराज्य जलविद्युत प्रकल्पाचे सर्व जनित्रसंच

कार्यान्वित झाले असून महाराष्ट्रास या प्रकल्पापासून वार्षिक १,१२० दशलक्ष युनिट्सचा लाभ मिळणार आहे. सन २००८-०९ या वर्षाकरिता जलविद्युत प्रकल्पांसाठी रुपये ४०० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्प.**

**१२६.** जागतिक बँक सहाय्यित महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रक ल्प सप्टेंबर, २०११ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. महाराष्ट्र सिंचन पद्धतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन कायदा २००५ अंतर्गत प्रकल्पांतर्गत एकंदर २८६ पाटबंधारे योजनांच्या कार्यक्षेत्रात सुमारे १,६०० पाणी वापर संस्था स्थापन करुन पाणी वितरण व्यवस्थेतील दुरुस्ती नंतर या कार्यक्षेत्रातील पाणी व्यवस्थापन, देखभाल दुरुस्ती पाणीवापर संस्थाना हस्तांतरीत करावयाची आहे. वीस मोठ्या / मध्यम प्रकल्पांच्या कालवा व वितरीका स्तरावरील पुनर्स्थापना/नूतनीकरणाच्या रुपये २९० कोटीच्या कामाकरिता कार्यारंभ आदेश देण्यात आले असून कामे प्रगतीपथावर आहेत.

**खारभूमी विकास योजना.**

**१२७.** सन २००७-२००८ या वर्षात एकूण ४८ खारभूमी योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. सन २००७-०८ मध्ये रुपये २० कोटीचा नियतव्यय उपलब्ध असून या वर्षात १५ योजना पूर्ण करुन १,२२९ हेक्टर क्षेत्र पुन:प्रापित करण्याचे उद्दिष्ट आहे. यासाठी सन २००८-०९ साठी सदर प्रयोजनार्थ रुपये २५ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**जलस्वराज्य प्रकल्प.**

**१२८.** जागतिक बँकेच्या अर्थसाहाय्याने जलस्वराज्य प्रकल्प हा मागणी आधारित व लोकसहभाग तत्वावर आधारित असून, राज्यातील विविध २६ जिल्ह्यातील ३,०८० ग्रामपंचायतींमध्ये राबविण्यात येत आहे. प्रकल्पाचा एकूण आराखडा १,३९५.५२ कोटी एवढ्या रकमेचा आहे. या प्रकल्पांतर्गत डिसेंबर, २००७ अखेर १,३४२ ग्रामपंचायतींमध्ये पाणी पुरवठा सुरु झाला आहे. सन २००७-०८ या वर्षात रुपये १५४ कोटी इतका खर्च झाला असून, सन २००८-०९ मध्ये करिता

या प्रयोजनार्थ रुपये ६५ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**भारत निर्माण ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रम.**

**१२९.** भारतनिर्माण कार्यक्रमांतर्गत राज्य शासनाने ग्रामीण भागातील सर्व वस्त्या व शाळांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्च, २००९ पर्यंत सोडविण्यास प्राधान्य दिले आहे. त्यानुसार २२,७३८ वस्त्यांसाठी रुपये २,४५५ कोटी इतक्या रकमेचा कृती आराखडा केंद्र शासनास सादर केला आहे. सन २००७-०८ मध्ये केंद्र शासनाकडून वर्धित वेग ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाखाली रुपये ४०४.४० कोटी अनुदान प्राप्त झाले असून, १४,९७६ गावे आणि वाड्यात पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करुन देण्याचे उद्दिष्ट आहे.

**ग्रामीण पाणी पुरवठा योजना.**

**१३०.** राज्य अर्थसंकल्पात ग्रामीण पाणी पुरवठा योजनेकरिता सन २००८-०९ साठी रुपये ४६३.९७ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

**ग्रामीण स्वच्छता अभियान.**

**१३१.** संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान यशस्वी झाल्यानंतर हागंणदारी मुक्त गाव ही संकल्पना ग्रामीण जनतेच्या संयुक्त प्रयत्नाने राज्यात मोठ्या प्रमाणात राबविण्यात येत आहे. या प्रयत्नाला राज्याच्या ग्रामीण जनतेने सकारात्मक प्रतिसाद दिला असून, स्वच्छता कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र राज्य संपूर्ण देशात आघाडीवर आहे. आतापर्यंत महाराष्ट्रातील २,३६७ ग्रामपंचायती व महाबळेश्वर पंचायत समितीस केंद्र शासनाचा निर्मल ग्राम पुरस्कार मा.राष्ट्रपती यांच्या हस्ते प्राप्त झाला आहे. या योजनेमुळे ग्रामीण भागातील पर्यावरण व लोकांचे आरोग्य यात लक्षणीय सुधारणा होत आहे.

**राजीव गांधी राष्ट्रीय पेय जल योजना.**

**१३२.** ग्रामीण भागात पाणी पुरवठा करण्यासाठी केंद्र शासनाने ही योजना सुरु केली असून, ही योजना वर्धित वेग कार्यक्रम म्हणून ओळखली जाते. हा कार्यक्रम आता भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत समाविष्ट करण्यात आला आहे. केंद्र शासनाने मंजूर केलेल्या निधीच्या

सम प्रमाणात (१००:१००) राज्य शासनाकडून निधी मंजूर करण्यात येतो. दहाव्या पंचवार्षिक योजनेत या कार्यक्रमाखाली केंद्र शासनाकडून रुपये १,२०४.०५ कोटी निधी प्राप्त झाला होता. सन २००७-०८ या आर्थिक वर्षात रुपये ४०४.४० कोटी निधी प्राप्त झाला आहे.

अंगणवाडी इमारत बांधकाम.

**१३३.** अंगणवाडी इमारत बांधकामासाठी राज्य शासनाच्या निधीतून नव्याने योजना तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार सन २००८-०९ या वर्षाकरिता रुपये ३८ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात येत आहे.

पुरक पोषण आहार.

**१३४.** बालकांची काळजी व आहार सेवांचे विकेंद्रिकरणामुळे ८८ टक्के पेक्षा जास्त अंगणवाडी केंद्रांना पुरक पोषण आहाराचा पुरवठा स्वयंसहाय्यता बचत गट व महिला मंडळे यांच्या मार्फत होत आहे. सन २००७-०८ या वर्षात या योजनेंतर्गत रुपये ६५ कोटी इतका खर्च झाला असून सन २००८-०९ या वर्षाकरिता या प्रयोजनार्थ रुपये १११.३७ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

स्वयंसहाय्यता बचतगट-महिला आर्थिक विकास महामंडळ.

**१३५.** वर्ष २००७-०८ मध्ये राज्य शासनाने आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधी (आयफॅड) सहाय्यीत तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला सक्षमीकरण कार्यक्रम महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत राबविण्यासाठी मंजुरी दिलेली असून, या योजनेतंर्गत आयफॅडचा आर्थिक सहभाग रुपये ११५.४५ कोटी व राज्य शासनाचा आर्थिक सहभाग रुपये ५०.१५ कोटी इतका राहणार आहे. सदर योजना ही ८ वर्षांच्या कालावधीसाठी असून, त्यामध्ये सध्याच्या बचत गटांसह एकूण ६२,६७५ स्वयंसहाय्य बचत गटांची स्थापना व बळकटीकरण केले जाणार आहे.

नागपूर येथे हज हाऊसचे बांधकाम.

**१३६.** नागपूर व लगतच्या परिसरातील लोकांना हज यात्रेला जाण्यासाठी सोयीचे व्हावे यासाठी राज्य सरकारने नागपूर येथे हज हाऊस बांधण्याचा निर्णय २००४ या वर्षी घेतला.

**१३६.१** हज हाऊसच्या बांधकामासाठी रुपये ९.०४ कोटी एवढ्या सुधारित अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. राज्य शासनाने हज हाऊसच्या बांधकामासाठी आतापर्यंत रुपये ४ कोटी सहायक अनुदान उपलब्ध करुन दिले आहे. उर्वरित रक्कम सन २००८-०९ या वर्षात उपलब्ध करुन देण्यात येईल.

**राज्य शासनात अल्पसंख्याक विकास विभागाची निर्मिती.**

**१३७.** मा.पंतप्रधानांनी देशातील मुस्लिम समाजाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिकदृष्टया मागासलेपणाबाबत अभ्यास करण्याकरिता न्या. राजिंदर सच्चर यांच्या अध्यक्षतेखाली एका उच्चस्तरीय समितीची स्थापना केली होती. या समितीने केंद्र शासनास सर्वसमावेशक अहवाल सादर केला असून मुस्लिम समाजातील वंचित घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी काही शिफारशी सुचविल्या आहेत.

**१३७.१** सद्यस्थितीत, राज्यातील अल्पसंख्याकांशी निगडीत विविध विषय हे राज्य शासनाच्या वेगवेगळया विभागांकडून हाताळले जातात. यामुळे राज्यातील अल्पसंख्याकांसाठी असलेल्या विविध कल्याणकारी योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमध्ये प्रशासकीय अडचणी निर्माण होतात.

**१३७.२** या गोष्टींचा विचार करून, न्या.सच्चर समितीने केलेल्या शिफारशींच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी तसेच अल्प-संख्याकांशी निगडीत असलेले सर्व विषय एकाच विभागाच्या नियंत्रणाखाली आणण्याकरिता स्वतंत्र प्रशासकीय विभागाची स्थापना करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. हा नवीन विभाग अल्पसंख्यांक विकास विभाग म्हणून ओळखला जाईल. अल्पसंख्यांकाच्या कल्याणाच्या योजनांसाठी सन २००८-०९ मध्ये रुपये १०० कोटी इतका नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात येईल. मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे भागभांडवल रुपये ५०

कोटींपर्यंत वाढविण्याचे प्रस्तावित असून, वर्षभरात आवश्यकतेनुसार अधिक निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

**१३७.३** माझ्या अर्थसंकल्पविषयक प्रस्तावांमध्ये निरनिराळ्या विभागांना रुपये १,४०० कोटी अतिरिक्त नियतव्यय देण्यासंबंधी उल्लेख केला आहे. ही रक्कम मुंबई उपनगर जिल्ह्यात ०.३३ वाढीव चटई निर्देशांकावरील अधिमूल्य, अधिक चांगले करसंकलन व प्रशासन व अतिरिक्त महसूल उभारण्याचे करप्रस्ताव यामधून उपलब्ध करण्यात येईल. मी आता माझ्या करप्रस्तावांकडे वळतो.

**मी आता अर्थसंकल्पाच्या भाग-२ कडे वळत आहे.**